मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०३/०६/२०१७.

## मा.स्थायी समिती

### सभा सूचना क्रमांक ०४

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. ०८/०६/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. सभापती, स्थायी समिती यांचे मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०४, विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **<u>मागील सभांचेइतिवृत्तांत</u> –** |
| २१ | दि. १७/०२/२०१७, दि. ०७/०३/२०१७ व १०/०४/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **<u>मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)</u>**-निरंक |
| --- | **<u>विनंती अर्ज</u>** - निरंक |
| --- | **<u>परिवहन व विशेष समित्यांचे ठराव</u>** - निरंक |
| --- | **<u>आयुक्तांकडील पत्रे व कामकाज</u> -** |
| २२ | क्रिडा संकुल व्यवस्थापन व संचलनासाठी देणेबाबत मंजूरी. |
| २३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील किनारपट्टीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लागवड करुन २ वर्ष निगा व देखभाल करणे. (वार्षिक निविदा) |
| २४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी वृक्षारोपण करुन २ वर्ष निगा व देखभाल करणे. (वार्षिक निविदा) |
| २५ | मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ कामी संगणक व साहित्य खरेदी करणेबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| २६ | मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ कामी व्हिडीओ शुटींग करणे, फोटोग्राफी करणे व सी.सी. टी.व्ही यंत्रणा बसविणे करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| २७ | महापालिका हद्दीतील स्मशानभुमि करीता जळाऊ लाकडे पुरवठा कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. |
| २८ | मनपा, क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान साचणाऱ्या पावसाच्या पाण्याचा उपसा करणेकामी विविध क्षमतेचे सक्शनपंप पुरवठा कामाच्या निविदांना मंजूरी देणे. |
| २९ | विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| ३० | निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ३१ | मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग) |
| --- | **<u>शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे</u>** |
| --- | **<u>समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल</u>** - निरंक |

**दिनांक :- ०३/०६/२०१७.**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. विशेष स्थायी समिती सभा

# दि. १७/०२/२०१७

# रोजीचे इतिवृत्तांत

सुचना क्र. १५ दि. १३/०२/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दुपारी ३.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रभाकर म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | मा. सभापती |
| २. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ३. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ४. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| ५. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ७. | श्री. राकेश रतिशचंद्र शहा | सदस्य |
| ८. | श्री. यशवंत ठकाजी कांगणे | सदस्य |
| ९. | श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली | सदस्या |
| १०. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्य |
| १२. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| १३. | श्रीम. झिन्नत रऊफ कुरेशी | सदस्या |

**गैरहजर सदस्य– निरंक**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| २. | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | सदस्या |
| ३. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचीमा. विशेष स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १७/०२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १५, दि. १३/०२/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १३६, सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**राकेश शहा :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि सुधारित अंदाजपत्रकातील वाढ/घट त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात रक्कम रु. २७.०० लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत. तसेच सोबत जोडण्यांत आलेल्या प्रस्तावित विकास कामांच्या यादीस मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2016-17 | 2017-18 |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक = **एकूण जमा** | 138906.60 | 156247.68 |
| सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक = **एकूण खर्च** | 131035.01 | 156220.68 |
| **अखेरची शिल्लक** | **7871.59** | **27.00** |

मर्लिन डिसा :-

आमची पण काम घ्यायची आहेत.

**दिपक खांबित :-**

तुमची काम सांगा.

**मर्लिन डिसा :-**

काम सांगणार पण जे हेड काढून टाकले आहेत त्याच्याविषयी विचारायचे होते. मिरारोड सुशोभिकरण मिरारोड पार्किंग हेड काढून टाकला आहे तो पुन्हा टाका.

**दिपक खांबित :-**

ते हेड वृक्ष प्राधिकरणाच्या बजेटमध्ये घेतले ते इकडे घ्यायचे म्हणून बोलले आहेत.

**मर्लिन डिसा:-**

प्राव्हिजन किती आहे.

**दिपक खांबित :-**

मिरारोड स्टेशन सुशोभिकरण १ करोड

**मर्लिन डिसा :-**

२ करोड करा. १ करोडमध्ये काय होणार आहे.

**दिपक खांबित :-**

मॅक्झीमम काम ३१ मार्च पर्यत पूर्ण होणार आणि थोड फार राहील ते पूढच्या वर्षात जाईल म्हणून आपण १ कोटी घेतले.

**मर्लिन डिसा :-**

काम पूर्ण कधी होणार.

**दिपक खांबित:-**

मे पर्यत होणार.

**मर्लिन डिसा :-**

मिरारोड पार्किंगचे.

**दिपक खांबित :-**

पार्किंगचे होणार नाही. पार्किंगचे सध्या ओपन आहे. पार्किंगला २५-३० करोड खर्च आहे.

**मर्लिन डिसा :-**

टप्प्या टप्प्याने घ्या ना.

**दिपक खांबित :-**

सी.आर.झेड निघाला की आपण घेऊ. ती जागा सी.आर.झेड. मध्ये आहे. डेव्हलप पण करता येत नाही. म्हणून ते राहिले आहे. २-४ महिण्यात सी.आर.झेड निघेल मग आपण घेऊ.

**मर्लिन डिसा :-**

जाफरी खाडीचे नाले पाहिजे होते ती भिंत पडत आहे.

**दिपक खांबित :-**

शांती शॉपिंग सेंटरचा नाला घेतला आहे. मिरारोडचा नाला घेतला आहे. मिरारोड रेल्वे समांतर तो पण नाला घेतला आहे. जॉर्गस पार्कला दोन कोटी घेतले आहेत.

**मर्लिन डिसा :-**

रेल्वे समांतर पोस्ट ऑफिस ते स्मशान भुमीपर्यत शॉपिंग सेंटरचा नाला घेतला आहे. पूनम सागरमध्ये...............

**दिपक खांबित :-**

पूनम सागरमध्ये जेवढी गटार आहेत ती बंद करायला घेतली आहेत.

**मर्लिन डिसा :-**

पूनमसागरमध्ये गटार बंद करून स्लॅब टाकणे आणि इंटरनल रस्ते.

**दिपक खांबित :-**

रस्ते तर आहेतच

**मर्लिन डिसा :-**

शांतीनगरमध्ये पॅचवर्क आहे एम.टी.एन.एल रोड खराब झालेला आहे. जे रोड खराब आहेत ते घ्यायचे. शितलनगमध्ये बाऊन्ड्री वर्कचे घ्याना. हस्तांतर करून घ्या. माधव टॉवरला आर.जी. प्लॉट झालेला आहे.

**दिपक खांबित:-**

आर.जी. ची जागा आहे ना तिकडे खाजगी.............

शांतीनगरमध्ये करारनामा करून जागा दिल्या आहेत.

**मर्लिन डिसा :-**

तुम्ही पण करारनामा करून घ्या. तुमच्याकडे दूसरी काही प्रोव्हिजन नाही का? मी मुलांसाठी सांगते. माझ्यासाठी बोलत नाही.

**शरद पाटील :-**

मी तुमच्या मताशी सहमत आहे.

**मर्लिन डिसा :-**

त्यांनी विरोध केला होता तरी शिवमूर्ती नाईक साहेबांनी करून दिले होते. १९६,१७८ तिकडे स्पोर्टस ॲक्टीव्हिटी डेव्हलप करा. आर्चिस ते कॉस्मोपॉलेटिन शाळा आणि शितल स्वर ते शितल प्लाझा पर्यंत गटर.

**दिपक खांबित :-**

छोटे मोठे आहे ते बजेटमध्ये होऊन जाईल.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३६ :-**

सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२५ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि सुधारित अंदाजपत्रकातील वाढ/घट त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात रक्कम रु. २७.०० लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे *अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत. तसेच सोबत* जोडण्यांत आलेल्या प्रस्तावित विकास कामांच्या यादीस मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2016-17 | 2017-18 |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक = एकूण जमा | 138906.60 | 156247.68 |
| सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक = एकूण खर्च | 131035.01 | 156220.68 |
| **अखेरची शिल्लक** | **7871.59** | **27.00** |

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव:-**

प्रकरण क्र. १३७, सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अग्निशमन अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**हरिश्चंद्र आमगावकर:-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले अग्निशमन विभागाचे सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये लेखाशिर्षनिहाय वाढ/घट तसेच इतर दुरूस्त्या करून अग्निशमन विभागाच्या अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| एकूण जमा | 3211.22 | 3297.52 |
| एकूण खर्च | 2325.13 | 3203.14 |
| अखेरची शिल्लक | **886.09** | **94.38** |

**वर्षा भानुशाली:-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३७ :-**

सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अग्निशमन अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२६ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले अग्निशमन विभागाचे सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये लेखाशिर्षनिहाय वाढ/घट तसेच इतर दुरूस्त्या करून अग्निशमन विभागाच्या अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2016-17 सुधारित | 2017-18 मुळ |
|---|---|---|
| एकूण जमा | 3211.22 | 3297.52 |
| एकूण खर्च | 2325.13 | 3203.14 |
| अखेरची शिल्लक | **886.09** | **94.38** |

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगांवकर अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव:-**

प्रकरण क्र. १३८ वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**शर्मिला बगाजी :-**

वृक्ष प्राधिकरण समितीने सादर केलेल्या अंदाजपत्रकात लेखाशीर्षनिहाय वाढ/घट करुन सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2016-17 सुधारित | 2017-18 मुळ |
|---|---|---|
| एकूण जमा | 365.00 | 470.00 |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 1722.71 | 2495.00 |
| एकूण खर्च | **2087.71** | **2965.00** |

**वर्षा भानुशाली:-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३८ :-**

वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

***ठराव क्र. १२७ :-***

वृक्ष प्राधिकरण समितीने सादर केलेल्या अंदाजपत्रकात लेखाशीर्षनिहाय वाढ/घट करुन सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2016-17 सुधारित | 2017-18 मुळ |
|---|---|---|
| एकूण जमा | 365.00 | 470.00 |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 1722.71 | 2495.00 |
| एकूण खर्च | **2087.71** | **2965.00** |

**सुचक :- श्रीम. शर्मिला बगाजी** **अनुमोदन :- श्रीम. तारा घरत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव:-**

प्रकरण क्र. १३९, शिक्षण विभागाचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**मर्लिन डिसा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे अंदाजपत्रकात लेखाशीर्षनिहाय वाढ/घट करुन सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2016-17 सुधारित | 2017-18 मुळ |
|---|---|---|
| एकूण जमा | 695.00 | 763.00 |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 1338.25 | 1049.25 |
| एकूण खर्च | **2033.25** | **1812.25** |

**वर्षा भानुशाली:-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३९ :-**

शिक्षण विभागाचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे अंदाजपत्रकात लेखाशीर्षनिहाय वाढ/घट करुन सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2016-17 सुधारित | 2017-18 मुळ |
|---|---|---|
| एकूण जमा | 695.00 | 763.00 |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 1338.25 | 1049.25 |
| एकूण खर्च | **2033.25** | **1812.25** |

**सुचक :- श्रीम. मर्लिन डिसा    अनुमोदन :- श्रीम. झिनत कुरेशी**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव:-**

प्रकरण क्र. १४०, परिवहन सेवेचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक मान्यता मिळणेबाबत.

**यशवंत कांगणे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2016-17 सुधारित | 2017-18 मुळ |
|---|---|---|
| परिवहन **जमा** | 5691.03 | 7707.38 |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 1050.00 | 330.00 |
| एकूण खर्च | **6741.03** | **8037.38** |

**राजू भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १४० :-**

परिवहन सेवेचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2016-17 सुधारित | 2017-18 मुळ |
|---|---|---|
| परिवहन **जमा** | 5691.03 | 7707.38 |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 1050.00 | 330.00 |
| एकूण खर्च | **6741.03** | **8037.38** |

सुचक :- श्री. यशवंत कांगणे    अनुमोदन :- श्री. राजु भोईर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपण्याची वेळ ३.३५ वाजता.)**

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. स्थायी समिती सभा

# दि. ०७/०३/२०१७

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०१७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०७/०३/२०१७ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. ०२/०३/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रभाकर म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | मा. सभापती |
| २. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ३. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ४. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ५. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ७. | श्री. राकेश रतिशचंद्र शहा | सदस्य |
| ८. | श्री. यशवंत ठकाजी कांगणे | सदस्य |
| ९. | श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली | सदस्या |
| १०. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्य |
| १२. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| १३. | श्रीम. झिन्नत रऊफ कुरेशी | सदस्या |

**गैरहजर सदस्य– निरंक**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| २. | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | सदस्या |
| ३. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांना नमस्कार. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०७/०३/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १६, दि. ०२/०३/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १४१, दि. १०/०२/२०१७ (दि. ०७/०१/२०१७ रोजीची स्थगित सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

दि. १०/०२/२०१७ (दि. ०७/०१/२०१७ रोजीची स्थगित सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मर्लिन डिसा :-**

मा. सभापती साहेब मला एक विचारायचे होते पान क्र. २, पान क्र. ४ वर्षा भानुशाली मॅडम ठराव करीत आहेत. पान क्र. ४ वर आणि पान २ वर बोलत आहेत. एवढ्या त्या बोलल्या आहेत का? ठराव असा सुरु होतो का? ठराव मागच्या बाजूला आहे. ठराव क्र. १०० पण तसाच सुरु होतो. ते जरा एक्सप्लेन करा.

**प्र. नगरसचिव :-**

ठराव क्र. १०० दिले आहे ना. संबंधित अधिकाऱ्याला उत्तर द्यायला सांगा. एवढा मोठा प्रोग्राम राबवला आहे आणि प्रोटोकॉल माहित नाही तेवढ वाक्य कमी करणार आहे. बाकी सेम आहे.

**मर्लिन डिसा :-**

पान क्र. २ वर पण सेम करेक्शन. पान क्र. १६ नं. ४ मिरारोड पूर्व येथील मुस्लीम कब्रस्तान खासदार निधी ही कोणाची खासदार निधी. कोणी दिले ते जरा सांगा.

**प्र. नगरसचिव :-**

ठरावातच तसे आलेले आहे.

**मर्लिन डिसा :-**

कोणत्या खासदाराची निधी आहे ते सांगा. क्र. ६ मध्ये अल्पसंख्यांक निधी किती आलेली कोणत्या खासदारानी दिली ते सांगा.

**प्र. नगरसचिव :-**

मॅडम माहिती घेऊन देतो.

**मर्लिन डिसा :-**

अल्पसंख्याक निधी किती असते.

**शरद पाटील :-**

मा. सभापती महोदय हा इतिवृत्तांत नव्हता हा तर विषय होता हा विषय होता त्यावेळी आपण विचारायला पाहिजे होते. आपण इतिवृत्तांत मंजूरी देतो.

**मर्लिन डिसा :-**

तुम्ही मंजूरी घ्या मला क्लेरिफिकेशन पाहिजे. मैं ऑब्जेक्शन नही ले रही हूँ।

**शरद पाटील :-**

वो सब्जेक्ट पहिले था तभी आपले पूछा नही। उस टाईम पूछते तो आज माहिती लेके आते थे।

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब हे बरोबर नाही. कुठच्या खासदाराने दिले हे आज माहित नसेल तर त्याची माहिती ठेवायला पाहिजे.

**प्रकरण क्र. १४१ :-**

दि. १०/०२/२०१७ (दि. ०७/०१/२०१७ रोजीची स्थगित सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १३० :-**

दि. १०/०२/२०१७ (दि. ०७/०१/२०१७ रोजीची स्थगित सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर  अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४२, परवाना फी मध्ये वाढ करणेबाबत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापती साहेब प्रभाग समिती ३ व ४ चा रस्ता तलाव रोड तो बी.पी. रोडच्या तलाव रोड पण चालू होतो. तो नवघर रोडला संपतो. ८-१० दिवसापासून एवढे फेरिवाले बसले आहेत की आपण पायी पण चालू शकत नाही. तुम्ही त्याच्यावर कारवाई करणार की नाही करणार कारण लोकांना आम्हाला उत्तर द्यायला लागते. इतने फेरिवाले तलाव रोड पे कहाँ से आते है। ह्याचे उत्तर कोण देणार. कारवाई करणार की नाही करणार ते स्पष्ट करा.

**मर्लिन डिसा :-**

फेरिवाले शहरात सगळीकडे आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

वो नो हॉकर्स झोन है।

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब तुमच्या परवानगीने बोलतो प्रशासनाने ह्याच्यात लक्ष घालायचे की नाही घालायचे ते आम्हाला एकदाच सांगा. वेळोवेळी आम्ही इथे यायचे बोलायचे आणि जायचे आणि त्या फेरिवाल्यांचे ऐकायचे महानगरपालिका हमारे जेब में है। ह्याचा अर्थ आम्ही काय समजायचा ते पण सांगा त्याचे पण उत्तर द्या म्हणजे नक्की काय? जिथे नवीन रस्ता बनतो तिथे फेरिवाला जाऊन बसतात. ह्या लोकप्रतिनिधीचे काम आहे. तुम्हाला सांगितल्यानंतर करणार की तुम्ही बघितल्यानंतर उचलणार. फक्त तक्रार आल्यावर उचलणार की कन्टीन्यू करणार ह्याचे आम्हाला उत्तर द्या.

पूढच्या वेळेला मिटींग चालू देणार नाही. जसे आयुक्तांना टॅक्स वसूल करायला पाठवले आहे पण ... त्याच वेळेला सांगू आताच जायचे आणि उचलून यायचे. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग प्रत्येक मिटींगला बोलतो हे आपल्या शहरांचे नाक आहे त्या मार्गावर पण फेरिवाले बसतात ते उचलत नाही मग तुम्ही काय कारवाई करता आणि लोकांना काय सेवा देता ते आम्हाला सांगा. लोकांकडून टॅक्स का वसूल करता. ह्या सगळ्यांची उत्तर द्या.

**मर्लिन डिसा :-**

मिरारोड एन्ट्री ते मच्छी मार्केट निघतच नाही. संध्याकाळी तिथे चालू शकत नाही. रविवारी ३-४ लाईन लागतात. प्लास्टीक कंटेनर, बॉटल्स, लसून कांदे सगळे भाजी मार्केट मच्छी मार्केट तिकडे एवढा ट्राफीकचा कोंडा होतो. तिकडे अर्धा तास लागतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब तुम्ही तलाव रोडचे काय करणार ते सांगा. नाहीतर मी पूढच्या वेळेला खाली बसणार.

**वर्षा भानुशाली :-**

आम्ही सगळे बसणार आम्हाला सगळ्यांना प्रॉब्लेम आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्या ८ दिवसात एवढे फेरिवाले बसले लोकांना आम्हाला उत्तर द्यायला लागते.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

स्पोटर्स क्लबच्या बाजूला पण पूर्ण फेरिवाले बसले आहे.

**यशवंत कांगणे :-**

मा. सभापती महोदय जेसल पार्क में सबवे का काम चालू है। कालपासून पूर्ण रस्ता बंद केलेला आहे. रात्रीपासून यायचा जायचा रस्ता पण बंद केला. त्याठिकाणी सर्व फेरिवाले बसतात. तिकडे बाऊन्सर ठेवले आहेत मी तुम्हाला विनंती करतो जेवढे बाऊन्सर ठेवले आहेत ते काढून टाका. ते पैसे वेस्टेज आहेत. ते बाऊन्सर येतात आणि मोबाईलवर गेम खेळत बसतात. सर्व फेरिवाले जेसल पार्कच्या नाक्यावर येऊन जमा होतात आणि पूर्ण रस्ता जाम करुन टाकतात. ह्याच्यावर कारवाई झाली पाहिजे की नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सन्मा. सभापती महोदय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत. मा. आयुक्त परवा दिवशी आढावा घेतला त्यावेळी बांधकाम, अतिक्रमण विभागाला सुचना दिल्या. जे लोक काम करत नव्हते त्यांच्या इंटरनल बदल्या सुध्दा करायला सांगितल्या. कालच पथक प्रमुखांच्या बदल्या केलेल्या आहेत. तसेच सोमवार बाजार आणि इतर ठिकाणी जी कोंडी होते. ह्या ठिकाणी दैनंदिन कारवाई केली जात असे. प्रभाग अधिकाऱ्यांनी परवा सांगितले आता बी.पी. रोड, स्पोटर्स क्लब आणि जेसल पार्कचे सांगितले आहे.

**शरद पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब आपण सांगता आयुक्तांनी आमची मिटींग घेतली कोणावर कारवाई करायला सांगितली कोणाच्या इंटरनल बदल्या करायला सांगितल्या. हे आम्हाला सांगून चालणार नाही. कारवाई कशी करणार ते सांगा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आपला जो दैनंदिन रिपोर्ट आहे. आपण जसे आज सूचवले त्याप्रमाणे ८-१० तारखेपासून पूढच्या तारखेपर्यंत काय केले ते पूढच्या वेळेस देईन.

**शरद पाटील :-**

मला एक सांगा आपले जे प्रभाग अधिकारी आहेत त्यांचा काय सर्व्हे आहे ते सांगा. जे नविन रोड बनले त्याच्यावर किती फेरिवाले नव्हते आणि किती लगेच बसले त्याचा सर्व्हे तुमच्याकडे आहे का सांगा. म्हणजे आम्ही बोलल्यावर तुम्ही करणार.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

फेरिवाला धोरणाच्या बाबतीमध्ये शासनाने नविन गाईडलाइन्स दिलेल्या आहेत. त्यानुसार मध्यंतरी आपण सर्व्हे करायचा ठराव केला होता.

**शरद पाटील :-**

न्यायालयाने दिलेला विषय सोडून द्या. जुन्यांचा दिला आहे ना नविन रस्त्याचे कोणी अडवले ते तुम्ही सांगा. कुठच्या न्यायालयाने अडवले हे नविन जे रस्ते बनतात त्यावर नवीन फेरिवाला येऊन बसतो. तो कुठचा न्यायालयाचा आदेश आहे सांगा मला.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आपण जे सर्व्हे करायचा आहे नविन रस्त्यावर बसणार ठिक आहे.

**शरद पाटील :-**

त्यांना का तुम्ही बसून देता. म्हणजे परत त्यांनी न्यायालयात जायचं का?

नवीन रस्त्यावर फेरिवाले बसले असतील तर त्यांना मी काढायला सांगतो.

**शरद पाटील :-**

नवीन असे किती दाखवू तुम्हाला. सगळे नवीन रस्ते खचाखच भरले आहेत. त्याची जबाबदारी कोणाची पुन्हा ते कोर्टात गेल्यावर सांगणार आम्हाला न्यायालयाने आदेश दिले आहेत. आपल काम आहे न्यायालयाच्या आदेशाचा दबाव नाही हा उचलून टाका.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमचा तलाव रोड साफ झाला नाही तर आम्ही मिटींगला बसणार नाही.

**शरद पाटील :-**

पुढच्या वेळेला कारवाई झाली नाही तर आम्ही सभा करुन देणार नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

स्पोटर्स क्लबचे घ्या. स्पोटर्स क्लबला ताडपत्र्या बांधून पुन्हा हातगाड्या लागायल्या लागल्या.

**शरद पाटील :-**

साहेब पूर्ण मिरा भाईंदर फक्त तलाव रोड नाही.

**वर्षा भानुशाली :-**

डॉमीनोज के वहाँ पूरा खाऊगल्ली बनाके रखा है।

**मर्लिन डिसा :-**

मलबार किचन एक गाडी के अंदर ४ सिलेंडर...........

**शरद पाटील :-**

प्रेमनाथ पाटीलने जी तक्रार केली त्या रोडने २-२ प्रभाग अधिकारी जातात त्यांना दिसत नाही का? म्हणजे सांगितल्यानंतर दिसणार का ह्यांना चालायला मिळत नाही तर त्यांना चालायला मिळते का?

**मर्लिन डिसा :-**

मिरारोडला गाडीमध्ये ४ व्हिलरमध्ये ४ सिलेंडर ठेवून मलबार किचन हॉटेल चालवतात. १ सिलेंडर ब्लास्ट झाला तर कोणाचे नुकसान.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मोबाईल व्हॅनमध्ये जे व्यवसाय करतात त्या गाड्या पकडल्या होत्या. त्यांनी दंड भरुन ते घेऊन गेले. पुन्हा केल्यावर कोणी मध्यस्थी करु नका. आम्ही गाड्या सोडणार नाहीत.

**मर्लिन डिसा :-**

तुमच ॲक्शन अस व्हायला पाहिजे की रिपीट नाही व्हायला पाहिजे.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब तुम्ही गाडी तोडता ना. मग परत कशी देता.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

४ व्हिलर होत्या. मध्यंतरी इथेच चर्चा झाली. त्यावेळी बंद केल्या. ८-१५ दिवस ठेवल्या. आम्ही बिलकूल सोडत नव्हतो.

**शरद पाटील :-**

मा. सभापती महोदय, एक गहन प्रश्न बी.पी. रोड म्हणतात तो तिकडे लॉज आहेत त्याच्यावर किती कारवाई झाली? किती लॉजला परमिशन आहे आणि किती लॉजला परमिशन नाही. आज बी.पी. रोडची अशी परिस्थिती आहे जशी ग्रॅन्ट रोडची परिस्थिती आहे. त्याच्यावर का कारवाई करत नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

संबंधित विभागाचे विभागप्रमुख मंत्रालयात मिटींगला गेले आहेत. पुढच्या वेळेस मी ह्याची माहिती देतो.

**शरद पाटील :-**

लिहून ठेवा सगळ्या लॉजवर कारवाई झाली पाहिजे. विगर परमिशनचे जेवढे लॉज असतील त्यांच्यावर कारवाई करा. कारण पोलिसांजवळ तक्रार केली असता पोलीस बोलतात महापालिका त्या लॉजवर कारवाई करीत नाहीत तर आम्ही काय करणार. महापालिकेने कारवाई करावी नंतर आम्ही त्याला सील मारतो. तुम्ही त्या लॉजला सिल मारा तुम्ही सिल का मारत नाही.

**तारा घरत :-**

शाळेच्या बाजूचे लॉजींग.............

**शरद पाटील :-**

प्रकरण क्र. १४२ सदरचा ठराव फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १४२ :-**

परवाना फी मध्ये वाढ करणेबाबत.

**ठराव क्र. १३१ :-**

सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४३, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील शाळांतील विद्यार्थ्यांना आगामी वर्षात संगणक प्रशिक्षण देणेबाबत.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ३५ शाळांमधील विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देणेबाबत मा. महासभा दि.१८/०४/२००६, ठराव क्र.५ अन्वये मान्यता दिल्याप्रमाणे रितसर जाहिर निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेच्या अनुषंगाने मे.पॅन्सी टेक्नॉलॉजी यांचे सर्वात कमी दर प्रती विद्यार्थी रु.३५/- असल्याने त्यांना 'संगणक प्रशिक्षण' देणेकरीता मा.स्थायी समिती सभा दि.३१/०७/२००६ ठराव क्र.६८ नुसार मंजुरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने मे.पॅन्सी टेक्नॉलॉजी यांच्या सोबत करारनामा करणेत आला असून, करारनाम्यातील अट क्र.१४ नुसार दि.२०/१०/२००६ रोजी १० वर्षांसाठी संगणक प्रशिक्षण देण्यासाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर ठेक्याची मुदत दि.३० नोव्हेंबर २०१६ रोजी संपुष्टात आली आहे.

संगणक प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना संगणकाची आवड निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख, विडोंज, एक्सेसरिज, संगणक हाताळणी, एक्सेल, वर्ड, पॉवर पॉईंट सादरीकरण तसेच एज्युकेटर या सॉफ्टवेअर मार्फत विद्यार्थ्यांना गणित, इंग्रजी, सामान्य ज्ञान या विषयांचे अध्यापन करण्याचे सोपे जात आहे. तसेच xara3D या ॲनिमेशनच्या माध्यमातून भुगोल व भुमिती या विषयाचे ज्ञान होत आहे. त्यामुळे महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी काळाच्या गरजेनुसार संगणक प्रशिक्षणाची गरज असल्याने विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त आहे.

ई-टेडरिंगद्वारे पुढील निविदा मागविणेची कार्यवाही चालू करणेत आली असुन, निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वेळ लागणार आहे. सदर कालावधीत प्रती विद्यार्थी रु.३५/- प्रमाणेच पॅन्सी टेक्नॉलॉजी शालेय विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यास तयार आहे. तरी विद्यार्थ्यांच्या संगणक प्रशिक्षणात सातत्य राखण्याच्या दृष्टीने मे. पॅन्सी टेक्नॉलॉजी यांना दि.०१/१२/२०१६ ते निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस व त्यानुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस तसेच नविन निविदा काढणेसाठीच्या खर्चास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सर्वानुमते ठराव मंजूर.

**मर्लिन डिसा :-**

संगणक ट्रेनिंगमध्ये टोटल किती कम्प्युटर आहेत.

**देशमुख (शिक्षण अधिकारी) :-**

१७७.

**शर्मिला बगाजी :-**

एका विद्यार्थ्यासाठी ३५ रुपये असा ठराव लिहिला आहे. तर आठवड्यामध्ये किती तास असे काही शेड्यूल आहे का?

**देशमुख (शिक्षण अधिकारी) :-**

१ वर्गाचे दोन तास.

**मर्लिन डिसा :-**

दोन तास म्हणजे अर्ध्या तासाचा एक पिरेड आठवड्याला एक तास.

**शर्मिला बगाजी :-**

प्रत्येक शाळेत आपली किती कम्प्युटर असतील.

**देशमुख (शिक्षण अधिकारी) :-**

प्रत्येक शाळेत १०-१५ असतील.

**मर्लिन डिसा :-**

कुठल्या क्लास पासून शिकतात.

**देशमुख (शिक्षण अधिकारी) :-**

पहिलीपासून शिकतात.

**प्रकरण क्र. १४३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शाळांतील विद्यार्थ्यांना आगामी वर्षात संगणक प्रशिक्षण देणेबाबत.

**ठराव क्र. १३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ३५ शाळांमधील विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देणेबाबत मा. महासभा दि.१८/०४/२००६, ठराव क्र.५ अन्वये मान्यता दिल्याप्रमाणे रितसर जाहिर निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेच्या अनुषंगाने मे.पॅन्सी टेक्नॉलॉजी यांचे सर्वात कमी दर प्रती विद्यार्थी रु.३५/- असल्याने त्यांना 'संगणक प्रशिक्षण' देणेकरीता मा.स्थायी समिती सभा दि.३१/०७/२००६ ठराव क्र.६८ नुसार मंजुरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने मे.पॅन्सी टेक्नॉलॉजी यांच्या सोबत करारनामा करणेत आला असून, करारनाम्यातील अट क्र.१४ नुसार दि.२०/१०/२००६ रोजी १० वर्षासाठी संगणक प्रशिक्षण देण्यासाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर ठेक्याची मुदत दि.३० नोव्हेंबर २०१६ रोजी संपुष्टात आली आहे.

संगणक प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना संगणकाची आवड निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख, विडोंज, एक्सेसरिज, संगणक हाताळणी, एक्सेल, वर्ड, पॉवर पॉईंट सादरीकरण तसेच एज्युकेटर या सॉफ्टवेअर मार्फत विद्यार्थ्यांना गणित, इंग्रजी, सामान्य ज्ञान या विषयांचे अध्यापन करण्याचे सोपे जात आहे. तसेच xara3D या ॲनिमेशनच्या माध्यमातून भुगोल व भुमिती या विषयाचे ज्ञान होत आहे. त्यामुळे महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी काळाच्या गरजेनुसार संगणक प्रशिक्षणाची गरज असल्याने विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त आहे.

ई-टेडरिंगद्वारे पुढील निविदा मागविणेची कार्यवाही चालू करणेत आली असुन, निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वेळ लागणार आहे. सदर कालावधीत प्रती विद्यार्थी रु.३५/- प्रमाणेच पॅन्सी टेक्नॉलॉजी शालेय विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यास तयार आहे. तरी विद्यार्थ्यांच्या संगणक प्रशिक्षणात सातत्य राखण्याच्या दृष्टीने मे. पॅन्सी टेक्नॉलॉजी यांना दि.०१/१२/२०१६ ते निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस व त्यानुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस तसेच नविन निविदा काढणेसाठीच्या खर्चास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४४, मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टासर्य अधिकृत विक्रेते) यांचेकडून थेट पध्दतीने ट्युबलेस टायर्स खरेदी केलेले कामास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.

**शरद पाटील :-**

**संदर्भ :** १) मे. कमल मोटर्स (मे. टाटा मोटर्स यांचे अधिकृत सर्व्हिस सेटंर) यांचे दि.०४/०८/२०१६ रोजीचे ई- मेल द्वारे दर.
२) मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टायर्स अधिकृत विक्रेते) यांचे दर.
३) मे. श्री. ए.डी. इंटरप्रायझेस यांचे कोटेशन द्वारे प्राप्त दर.
४) टयुबलेस टायर पुरवठा करणे या कमासाठी दि.०५/१२/२०१६ रोजीचा काऊंट

मिरा भाईंदर महानगरपालिका केंद्रशासन पुरस्कृत JnNURM - II या योजने अंतर्गत मंजूर १०० बसेस पैकी दि. २५/१०/२०१५ पासून टप्याटप्याने ४८ बसेसची डिलेवरी घेणेत आलेली आहे. सदरच्या बसेस परिवहन उपक्रमास समाविष्ट झालेल्यास १ वर्षा पेक्षा अधिक कालावधी झालेला असल्यामुळे टायर्स खरेदी करणे आवश्यक होते.

सदर बसेससाठी नविन टायर्स खरेदी करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाने नविन "टयुबलेस टायर पुरवठा करणे" कामाची जाहिर निविदा सुचना शासनाचे निविदा संकेतस्थळावर व दि. २६/१२/२०१६ रोजीच्या दै. मुंबई तरुण भारत व साप्ताहिक राजवंजारा या वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली होती. परंतू मुदतीत दि.०५/१२/२०१६ पर्यंत संकेतस्थळावर '०' (शुन्य) निविदा प्राप्त झालेली आहे.

तथापी परिवहन उपक्रमामध्ये दर मंजूर नसल्याने आवश्यकते प्रमाणे प्रथम संदर्भिय क्र.०१ अन्वये मे. कमल मोटर्स (मे. टाटा मोटर्स यांचे अधिकृत सर्व्हिस सेंटर) यांचेकडून ई- मेल द्वारे दर मागविणेत आले. तद्नंतर संदर्भिय क्र.०२ अन्वये शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टायर्स यांचे अधिकृत सर्व्हिस सेंटर)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Apollo Tyre, Standard Bus (Per Tyre with fittings & Including all Taxes) | Rs. 26,052/- | Rs. 22,172/- | Rs. 23,950/- |
| २) | 235/75R17.5 Apollo Tyre, Midi Bus (Per Tyre with fittings & Including all Taxes) | Rs. 15,625/- | Rs. 12,728/- | Rs. 12,985/- |

टयुबलेस टायर्स पुरवठा करणे कामी मुदतीत एकही निविदा प्राप्त झाली नसल्याने व सद्यःस्थितीत ७० टायर्स खरेदी करणे अत्यंत आवश्यक असल्याने व वरिल तक्त्यान्वये दोन्ही टायर्सच्या प्रकारामध्ये मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. यांचे दर तुलनेने कमी असल्यामुळे मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टायर्स अधिकृत विक्रेते) यांचेकडून एकूण ७० टायर्स खरेदी करणेत आले सदरकामी A) Standard Tyre 42 X Rs. 22,172/- = 9,31,224/- व B) Midi Bus Tyre 28 X Rs.12,728/- = 3,56,384 एकूण A+B = 12,87,608 (अक्षरी बारा लाख सत्याऐंशी हजार सहाशे आठ मात्र) इतका खर्च झालेला असून त्याचे रु.१२,८७,६०८/- देयक प्रदान करणेत आले आहे.

सबब प्रवाशांना परिवहन सेवा उपलब्ध करुन देणेसाठी टायर्सची गरज व निकड पाहता महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) ५ (२) (२) अन्वये मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टायर्स अधिकृत विक्रेते) यांचेकडून ७० टायर्स खरेदी करणेसाठी झालेल्या खर्चास आजची स्थायी समिती सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सर्वानुमते ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १४४ :-**

मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टासर्य अधिकृत विक्रेते) यांचेकडून थेट पध्दतीने ट्युबलेस टायर्स खरेदी केलेले कामास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १३३ :-**

**संदर्भ** : १) मे. कमल मोटर्स (मे. टाटा मोटर्स यांचे अधिकृत सर्व्हिस सेटंर) यांचे दि.०४/०८/२०१६ रोजीचे ई- मेल द्वारे दर.
२) मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टायर्स अधिकृत विक्रेते) यांचे दर.
३) मे. श्री. ए.डी. इंटरप्रायझेस यांचे कोटेशन द्वारे प्राप्त दर.
४) टयुबलेस टायर पुरवठा करणे या कमासाठी दि.०५/१२/२०१६ रोजीचा काऊंट

मिरा भाईंदर महानगरपालिका केंद्रशासन पुरस्कृत JnNURM - II या योजने अंतर्गत मंजूर १०० बसेस पैकी दि. २५/१०/२०१५ पासून टप्याटप्याने ४८ बसेसची डिलेवरी घेणेत आलेली आहे. सदरच्या बसेस परिवहन उपक्रमास समाविष्ट झालेल्यास १ वर्षा पेक्षा अधिक कालावधी झालेला असल्यामुळे टायर्स खरेदी करणे आवश्यक होते.

सदर बसेससाठी नविन टायर्स खरेदी करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाने नविन "टयुबलेस टायर पुरवठा करणे" कामाची जाहिर निविदा सुचना शासनाचे निविदा संकेतस्थळावर व दि. २६/१२/२०१६ रोजीच्या दै. मुंबई तरुण भारत व साप्ताहिक राजबंजारा या वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली होती. परंतू मुदतीत दि.०५/१२/२०१६ पर्यंत संकेतस्थळावर '०' (शुन्य) निविदा प्राप्त झालेली आहे.

तथापी परिवहन उपक्रमामध्ये दर मंजूर नसल्याने आवश्यकते प्रमाणे प्रथम संदर्भिय क्र.०१ अन्वये मे. कमल मोटर्स (मे. टाटा मोटर्स यांचे अधिकृत सर्व्हिस सेंटर) यांचेकडून ई- मेल द्वारे दर मागविणेत आले. तद्नंतर संदर्भिय क्र.०२ अन्वये शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टायर्स यांचे अधिकृत सर्व्हिस सेंटर) यांचेकडील दर मागवून आवश्यक ते टायर्स थेट खरेदी करणेत आले. त्यानंतर संदर्भिय क्र.०३ अन्वये पुनःश्च

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | 295/80R22.5<br>Apollo Tyre, Standard Bus<br>(Per Tyre with fittings & Including all Taxes) | Rs. 26,052/- | Rs. 22,172/- | Rs. 23,950/- |
| २) | 235/75R17.5<br>Apollo Tyre, Midi Bus<br>(Per Tyre with fittings & Including all Taxes) | Rs. 15,625/- | Rs. 12,728/- | Rs. 12,985/- |

टयुबलेस टायर्स पुरवठा करणे कामी मुदतीत एकही निविदा प्राप्त झाली नसल्याने व सद्यःस्थितीत ७० टायर्स खरेदी करणे अत्यंत आवश्यक असल्याने व वरिल तक्त्यान्वये दोन्ही टायर्सच्या प्रकारामध्ये मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. यांचे दर तुलनेने कमी असल्यामुळे मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टायर्स अधिकृत विक्रेते) यांचेकडून एकूण ७० टायर्स खरेदी करणेत आले सदरकामी A) Standard Tyre 42 X Rs. 22,172/- = 9,31,224/- व B) Midi Bus Tyre 28 X Rs.12,728/- = 3,56,384 एकूण A+B = 12,87,608 (अक्षरी बारा लाख सत्याऐंशी हजार सहाशे आठ मात्र) इतका खर्च झालेला असून त्याचे रु.१२,८७,६०८/- देयक प्रदान करणेत आले आहे.

सबब प्रवाशांना परिवहन सेवा उपलब्ध करुन देणेसाठी टायर्सची गरज व निकड पाहता महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) ५ (२) (२) अन्वये मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. (मे. अपोलो टायर्स अधिकृत विक्रेते) यांचेकडून ७० टायर्स खरेदी करणेसाठी झालेल्या खर्चास आजची स्थायी समिती सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४५, कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत. (परिवहन विभाग)

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास केंद्रशासन पुरस्कृत JnNURM-II या योजनेअंतर्गत ९० बसेस मंजूर झालेल्या असल्याने व पी.पी.पी. ठेकेदाराविरुद्ध तक्रारी वाढत असल्याने व प्रत्यक्ष बस सेवा पुरवित नसल्यामुळे दि.२५/१०/२०१६ रोजी पासून बसेस महानगरपालिका स्वतः चालवित आहे. सद्यःस्थितीत ४७ बसेसची डिलेवरी घेउुन त्या एकुण १५ बस मार्गावर चालविणेत येत आहेत. सदरच्या बसेस GCC तत्वावर चालविणेचे धोरण मा. महासभा ठराव क्र.२१ दि.२८/०६/२०१६ रोजीच्या धोरणानुसार GCC तत्वावर बसेस चालविण्याची निविदा प्रसिद्धी केलेली असून पूढील कार्यवाही चालू आहे. माहे ऑक्टोंबर २०१५ पासून टप्याटप्याने खालील प्रमाणे बसेस प्राप्त झालेल्या आहेत.

| S.R | VEHICLE NO. | REGISTRATION DATE | K.M |
|---|---|---|---|
| 1 | MH04 EP 516 | 23/10/2015 | 86798 |
| 2 | MH04 EP 517 | 23/10/2015 | 80215 |
| 3 | MH04 EP 518 | 23/10/2015 | 86234 |
| 4 | MH04 EP 519 | 23/10/2015 | 73424 |
| 5 | MH04 EP 520 | 23/10/2015 | 92293 |
| 6 | MH04 EP 521 | 23/10/2015 | 72130 |
| 7 | MH04 EP 523 | 28/10/2015 | 78205 |
| 8 | MH04 EP 524 | 28/10/2015 | 67721 |
| 9 | MH04 EP 526 | 28/10/2015 | 69213 |

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | MH04 EP 530 | 06/11/2015 | 65132 |
| 14 | MH04 EP 531 | 28/10/2015 | 61238 |
| 15 | MH04 EP 532 | 28/10/2015 | 73200 |
| 16 | MH04 EP 533 | 28/10/2015 | 59318 |
| 17 | MH04 EP 534 | 28/10/2015 | 75818 |
| 18 | MH04 EP 535 | 28/10/2015 | 62183 |
| 19 | MH04 EP 536 | 28/10/2015 | 55975 |
| 20 | MH04 EP 537 | 28/10/2015 | 67232 |
| 21 | MH04 EP 547 | 30/12/2015 | 65289 |
| 22 | MH04 EP 548 | 30/12/2015 | 58208 |
| 23 | MH04 EP 549 | 30/12/2015 | 46305 |
| 24 | MH04 EP 550 | 30/12/2015 | 52332 |
| 25 | MH04 EP 551 | 30/12/2015 | 65350 |
| 26 | MH04 EP 552 | 30/12/2015 | 73255 |
| 27 | MH04 EP 553 | 30/12/2015 | 70997 |
| 28 | MH04 EP 554 | 30/12/2015 | 71073 |
| 29 | MH04 EP 632 | 02/06/2016 | 31045 |
| 30 | MH04 EP 633 | 02/06/2016 | 32712 |
| 31 | MH04 EP 634 | 02/06/2016 | 60747 |
| 32 | MH04 EP 635 | 02/06/2016 | 37853 |
| 33 | MH04 EP 636 | 02/06/2016 | 40015 |
| 34 | MH04 EP 637 | 02/06/2016 | 40568 |
| 35 | MH04 EP 638 | 02/06/2016 | 38649 |
| 36 | MH04 EP 639 | 02/06/2016 | 35144 |
| 37 | MH04 EP 640 | 02/06/2016 | 30443 |
| 38 | MH04 EP 641 | 02/06/2016 | 24053 |
| 39 | MH04 EP 642 | 02/06/2016 | 20272 |
| 40 | MH04 EP 643 | 02/06/2016 | 20123 |
| 41 | MH04 EP 644 | 02/06/2016 | 36894 |
| 42 | MH04 EP 653 | 29/06/2016 | 10734 |
| 43 | MH04 EP 719 AC | 15/08/2016 | 21622 |
| 44 | MH04 EP 720 AC | 15/08/2016 | 21202 |
| 45 | MH04 EP 721 AC | 15/08/2016 | 21410 |
| 46 | MH04 EP 722 AC | 15/08/2016 | 13179 |
| 47 | MH04 EP 723 AC | 15/08/2016 | 21002 |

वरिल प्रमाणे प्राप्त बसेस सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका शहर व शहराबाहेरील बस मार्गावर चालविणेत येत आहेत. सदर बसेसचे सुरवातीपासून सर्व्हिसिंग, किरकोळ दुरुस्ती हे मे. टाटा मोटर्स यांचे अधिकृत सर्व्हिसिंग सेंटर मे. कमल मोटर्स, नालासोपारा यांचेकडून करुन घेणेत येत असून माहे एप्रिल २०१६ ते माहे नोव्हेबंर २०१६ पर्यंत रक्कम रु.२३,२१,२६३/- (अक्षरी तेवीस लाख ऐकवीस हजार दोनशे त्रैसष्ठ मात्र) इतका खर्च करणेत आलेला आहे. सदर बसेस ५५ ते ६० हजार किलोमिटर चालल्यानंतर त्यांचे टायर्स बदलण्यात आलेले आहे. टायर्स अभावी बसेस उभ्या राहू नयेत याकरिता मे. अपोलो कंपनीचे अधिकृत टायर-विक्रेते मे. साई शक्ती टायर्स यांचेकडून एकुण ४० नग, त्यानंतर जाहिर कोटेशन द्वारे १२ नग टायर्स खरेदी कामी अनुक्रमे ७,०४,०००/-, रु.१,९९,६८०/- इतका खर्च करणेत आलेला आहे. सदर कामी एकूण रक्कम रु.०९,०३,६८०/- इतका खर्च आलेला आहे. सद्यःस्थितीत टायर्स खरेदी करणेसाठी निविदा मागवून दर मंजूर करणेची कार्यवाही चालू आहे.

पी.पी.पी. ठेकेदार मे. केस्ट्रेल इंन्फ्रा. प्रा. लि. यांच्याकडील प्रवासी बस तिकिटे दुरुपयोग होऊ नये याकरिता ती तातडीने ताब्यात घेणेत आलेली आहेत. त्यामध्ये काही तिकिटांची आवश्यकतेप्रमाणे कल्याण-डोबींवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील मंजूर दरानुसार मे. भवानी प्रिंटर्स ठेकेदाराकडून प्रवाशी तिकिटे छपाई करुन घेणेत आलेली आहेत. त्याकामी साधारणतः रक्कम रु.३,११,६००/- इतका खर्च आलेला आहे. सदर बाबत ऑनलाईन निविदा काढून तद्नंतर ०२ वेळा मुदतवाढ देऊन देखिल अल्पसा प्रतिसाद मिळालेला असून एक ठेकेदार प्राप्त झालेला असून निविदा कार्यवाही अतिंम टप्यात आहे. तरी वरिल प्रमाणे खर्च झालेला असून कार्योत्तर मंजूरी देण्यात येत असून तसेच जी. सी. सी. कंत्राट निविदा पूर्ण होई पर्यंत बसेसची

दुरुस्ती व देखभाल हे म. टाटा मोटर्स यांचे अधिकृत सर्व्हिस सेंटर मधूनच करणेस आजची स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

एका विषयात दोन विषय घेतले आहेत.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

टायरची मंजूरी त्यानंतर मेन्टेनन्स आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्यात तिकीट घेतले आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १४५ :-**

कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत. (परिवहन विभाग)

**ठराव क्र. १३४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास केंद्रशासन पुरस्कृत JnNURM-II या योजनेअंतर्गत ९० बसेस मंजूर झालेल्या असल्याने व पी.पी.पी. ठेकेदाराविरुद्ध तक्रारी वाढत असल्याने व प्रत्यक्ष बस सेवा पुरवित नसल्यामुळे दि.२५/१०/२०१६ रोजी पासून बसेस महानगरपालिका स्वतः चालवित आहे. सद्यःस्थितीत ४७ बसेसची डिलेवरी घेऊन त्या एकुण १५ बस मार्गावर चालविणेत येत आहेत. सदरच्या बसेस GCC तत्वावर चालविणेचे धोरण मा. महासभा ठराव क्र.२१ दि.२८/०६/२०१६ रोजीच्या धोरणानुसार GCC तत्वावर बसेस चालविण्याची निविदा प्रसिद्धी केलेली असून पूढील कार्यवाही चालू आहे. माहे ऑक्टोबर २०१५ पासून टप्याटप्याने खालील प्रमाणे बसेस प्राप्त झालेल्या आहेत.

| S.R | VEHICLE NO. | REGISTRATION DATE | K.M |
|---|---|---|---|
| 1 | MH04 EP 516 | 23/10/2015 | 86798 |
| 2 | MH04 EP 517 | 23/10/2015 | 80215 |
| 3 | MH04 EP 518 | 23/10/2015 | 86234 |
| 4 | MH04 EP 519 | 23/10/2015 | 73424 |
| 5 | MH04 EP 520 | 23/10/2015 | 92293 |
| 6 | MH04 EP 521 | 23/10/2015 | 72130 |
| 7 | MH04 EP 523 | 28/10/2015 | 78205 |
| 8 | MH04 EP 524 | 28/10/2015 | 67721 |
| 9 | MH04 EP 526 | 28/10/2015 | 69213 |
| 10 | MH04 EP 527 | 28/10/2015 | 63142 |
| 11 | MH04 EP 528 | 28/10/2015 | 73058 |
| 12 | MH04 EP 529 | 28/10/2015 | 67210 |
| 13 | MH04 EP 530 | 06/11/2015 | 65132 |
| 14 | MH04 EP 531 | 28/10/2015 | 61238 |
| 15 | MH04 EP 532 | 28/10/2015 | 73200 |
| 16 | MH04 EP 533 | 28/10/2015 | 59318 |
| 17 | MH04 EP 534 | 28/10/2015 | 75818 |
| 18 | MH04 EP 535 | 28/10/2015 | 62183 |
| 19 | MH04 EP 536 | 28/10/2015 | 55975 |
| 20 | MH04 EP 537 | 28/10/2015 | 67232 |
| 21 | MH04 EP 547 | 30/12/2015 | 65289 |
| 22 | MH04 EP 548 | 30/12/2015 | 58208 |
| 23 | MH04 EP 549 | 30/12/2015 | 46305 |
| 24 | MH04 EP 550 | 30/12/2015 | 52332 |
| 25 | MH04 EP 551 | 30/12/2015 | 65350 |
| 26 | MH04 EP 552 | 30/12/2015 | 73255 |
| 27 | MH04 EP 553 | 30/12/2015 | 70997 |
| 28 | MH04 EP 554 | 30/12/2015 | 71073 |
| 29 | MH04 EP 632 | 02/06/2016 | 31045 |
| 30 | MH04 EP 633 | 02/06/2016 | 32712 |
| 31 | MH04 EP 634 | 02/06/2016 | 60747 |
| 32 | MH04 EP 635 | 02/06/2016 | 37853 |

| | | | |
|---|---|---|---|
| 38 | MH04 EP 641 | 02/06/2016 | 24053 |
| 39 | MH04 EP 642 | 02/06/2016 | 20272 |
| 40 | MH04 EP 643 | 02/06/2016 | 20123 |
| 41 | MH04 EP 644 | 02/06/2016 | 36894 |
| 42 | MH04 EP 653 | 29/06/2016 | 10734 |
| 43 | MH04 EP 719 AC | 15/08/2016 | 21622 |
| 44 | MH04 EP 720 AC | 15/08/2016 | 21202 |
| 45 | MH04 EP 721 AC | 15/08/2016 | 21410 |
| 46 | MH04 EP 722 AC | 15/08/2016 | 13179 |
| 47 | MH04 EP 723 AC | 15/08/2016 | 21002 |

वरिल प्रमाणे प्राप्त बसेस सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका शहर व शहराबाहेरील बस मार्गावर चालविणेत येत आहेत. सदर बसेसचे सुरवातीपासून सर्व्हिसिंग, किरकोळ दुरुस्ती हे मे. टाटा मोटर्स यांचे अधिकृत सर्व्हिसिंग सेंटर मे. कमल मोटर्स, नालासोपारा यांचेकडून करुन घेणेत येत असून माहे एप्रिल २०१६ ते माहे नोव्हेंबर २०१६ पर्यंत रक्कम रु.२३,२१,२६३/- (अक्षरी तेवीस लाख ऐकवीस हजार दोनशे त्रैसष्ठ मात्र) इतका खर्च करणेत आलेला आहे. सदर बसेस ५५ ते ६० हजार किलोमिटर चालल्यानंतर त्यांचे टायर्स बदलण्यात आलेले आहे. टायर्स अभावी बसेस उभ्या राहू नयेत याकरिता मे. अपोलो कंपनीचे अधिकृत टायर-विक्रेते मे. साई शक्ती टायर्स यांचेकडून एकुण ४० नग, त्यानंतर जाहिर कोटेशन द्वारे १२ नग टायर्स खरेदी कामी अनुक्रमे ७,०४,०००/-, रु.१,९९,६८०/- इतका खर्च करणेत आलेला आहे. सदर कामी एकूण रक्कम रु.०९,०३,६८०/- इतका खर्च आलेला आहे. सद्यःस्थितीत टायर्स खरेदी करणेसाठी निविदा मागवून दर मंजूर करणेची कार्यवाही चालू आहे.

पी.पी.पी. ठेकेदार मे. केस्ट्रेल इंन्फ्रा. प्रा. लि. यांच्याकडील प्रवासी बस तिकिटे दुरुपयोग होऊ नये याकरिता ती तातडीने ताब्यात घेणेत आलेली आहेत. त्यामध्ये काही तिकिटांची आवश्यकतेप्रमाणे कल्याण-डोंबीवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील मंजूर दरानुसार मे. भवानी प्रिंटर्स ठेकेदाराकडून प्रवाशी तिकिटे छपाई करुन घेणेत आलेली आहेत. त्याकामी साधारणतः रक्कम रु.३,११,६००/- इतका खर्च आलेला आहे. सदर बाबत ऑनलाईन निविदा काढून तद्नंतर ०२ वेळा मुदतवाढ देऊन देखिल अल्पसा प्रतिसाद मिळालेला असून एक ठेकेदार प्राप्त झालेला असून निविदा कार्यवाही अतिंम टप्प्यात आहे. तरी वरिल प्रमाणे खर्च झालेला असून कार्योत्तर मंजूरी देण्यात येत असून तसेच जी. सी. सी. कंत्राट निविदा पूर्ण होई पर्यत बसेसची दुरुस्ती व देखभाल हे मे. टाटा मोटर्स यांचे अधिकृत सर्व्हिस सेंटर मधूनच करणेस आजची स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४६, महानगरपालिका अधिनियम अनुसूचि (ड) ५ (२) (२) अन्वये टायर खरेदी करणे बाबतच्या कामास मंजूरी देणेबाबत.

**शरद पाटील :-**

किती वेळा टायर्स घेतले.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

हे आधी घेतले मग बसेस सुरु केल्या त्याच्यानंतर आपल्या बसची संख्या वाढली आहे. त्या वाढीवसाठी हे घ्यायचे आहेत हे घेतलेले नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे घ्यायचे आहेत. अगोदरचे घेतलेले होते.

**मर्लिन डिसा :-**

ते टायर्स कधी घेतले होते.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ते दिवाळीच्या टाईमात घेतले होते.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ज्या ऑलरेडी बस बंद होत्या त्या बसला गेले. ह्या काळात ज्या बस चालल्या त्यांचा घसारा झाल्यानंतर...........

**मर्लिन डिसा :-**

आता किती घेणार.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

३० मिनीसाठी आणि ८२ स्टॅन्डर्डसाठी अशी डिमांड होती. त्याची किंमत २३ लाख आणि ४१ हजार. स्टॅन्डिंगने मान्यता दिल्यावर आपण मागवणार.

**शरद पाटील :-**

कुठच्या पेपरला ॲड दिली.

**कल्पिता पिंपळे :-**

ई टेन्डरींग.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ई-टेन्डरींग केले परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही.

**शरद पाटील :-**

ई-टेन्डरींग केवढे महाग देतात.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आपण त्याच्यापेक्षा स्वस्तामध्ये घेतला निगोशिएशन करुन घेतले. कंपनीचे जे रेट होते ३ वेळेस निविदा काढून एकच वेळेस निविदा आली. ती निविदा ओपन केली. निविदा ओपन केल्यावर असे लक्षात आले ह्यापूर्वीच्या ठरावामध्ये आपण निविदा बघितली ज्या टाईपच्या किंमती होत्या. त्यापेक्षा हे दर जास्त आले ४-५ हजारांनी जास्त आले. आपण त्यांना निगोशिएशनला बोलावले. त्यांनी निगोशिएशन करताना वाटाघाटीन एक ते दिड हजार कमी केले. मग आम्ही त्यांना सांगितले की तुम्ही आम्हाला मागच्या दराने पुरवा. कारण दिवाळीच्या वेळेस मागवले होते ते दर एवढे कमी आहेत परंतु त्यांनी असमर्थता दर्शवली. मागच्या दराने केले तरी नगरपालिकेचा फायदा आहे. त्यासाठी तुमची मान्यता घेऊन मागवणार आहोत.

**वर्षा भानुशाली :-**

डायरेक्ट कंपनीतून घ्या.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

डायरेक्ट कंपनी विकत नसते. जे त्याचे ऑथराईज्ड डिलर आहेत ते देतात.

**वर्षा भानुशाली :-**

जिथून गाडी खरेदी केली आहे त्याच्याकडून मागवू शकतो.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

गाडी खरेदी केली ते गाडी विकतात टायर विकत नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आपण पहिले घेतलेले टायर असतील ना.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आपल्याला गाडीसोबत जे टायर आले आहेत त्यानंतर ही पहिल्यांदा ७० टायरची खरेदी केलेली आहे. आणि ही दुसरी खरेदी आहे. ह्याच्यापेक्षा खालचे दर कुठे नाहीत. निगोशिएशन करुन सुध्दा निविदाधारकाला आपण जे बोललो होतो त्यांनी दीड हजारापेक्षा जास्त कमी केले नाहीत. त्यामुळे आपण मागच्या वेळचे जे दर आहेत. ऑथराइज्ड डिलरचे जे दर आहेत त्या दरानेच मागतो. ते सुध्दा ॲडव्हान्सपेमेन्ट मागतात त्याशिवाय देत नाहीत.

**शरद पाटील :-**

**संदर्भ** : १) मनपा/परि/११९/२०१६-१७, दि.२४/११/२०१६ रोजीची निविदा प्रसिध्दी.
२) मे. शक्ती साई टायर्स प्रा. लि. यांचे दि.२१/०२/२०१७ रोजीचे ई- मेल.
३) ॲड रवि व्यास (नगरसेवक मि.भा.मनपा) यांची दि.१८/०२/२०१७ रोजीची मागणी.
**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

तुम्ही मॅनेजेज कॅल्क्यूलेट करा. किती मूदत आहे. नंतर सांगा, गेल्या वर्षात त्यांनी फक्त १५२ निर्धारण केली. त्याच्या आधी ३६२ केली होती. त्याच्या आधी ५४२ केली होती. जर स्टाफ तेवढाच आहे तर निर्धारण कमी कमी कशी होतात.

**भासे :-**

त्या लोकांना परिवहन डिपार्टमेन्टला घेतले होते. त्यामूळे कमी झाली.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्याच्याकडून काम करून घेणे तुमची जबाबदारी आहे. वर्षाला जर कमी कमी निर्धारण होत आहेत तर काम करत नाही.

**राकेश शहा :-**

स्थानिक संस्था कर विभागात सध्या ०५ ऑडीट लिपीक कर्मचारी ठोक मासिक मानधन रक्कम (किमान वेतन रु. १५,३९३/-) यावर कार्यरत आहेत. त्यापैकी ०५ ऑडीट लिपीक कर्मचारी यांचा कार्यकाल दि. ०९/०२/२०१७ रोजी संपत आहे. सदरच्या कर्मचाऱ्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांची नावे | मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|
| १. | श्री. सचिन सुपूगडे | दि. ०९/०२/२०१७ |
| २. | श्री. सुशांत सुर्वे | दि. ०९/०२/२०१७ |
| ३. | श्री. रविनाथ शिवगन | दि. ०९/०२/२०१७ |
| ४. | श्रीम. हेमाली बावकर | दि. ०९/०२/२०१७ |
| ५. | श्रीम. निशा पटेल | दि. ०९/०२/२०१७ |

सदर कर्मचाऱ्यांची स्थानिक संस्था कर विभागास आवश्यकता आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार नेमणुकीच्या नवीकरणासाठी मा.स्थायी समितीची पूर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे. महानगरपलिकेतील तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत ऑडीट लिपीक कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन मिळणेस शिफारस आहे. तसेच ऑडीट लिपीक यांना अन्य विभागात सामावून घेऊन त्यांना दि.१०/०२/२०१७ रोजीचा ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन, दि.१३/०२/२०१७ ते दि.१२/०८/२०१७ पर्यंत ही सभा मुदत वाढ देत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

०२ ने सं. पुन्हा मंजूर करण्यात येत आहे.

**शर्मिला बगाजी :-**

ठरावामध्ये वाचल्याप्रमाणे ऑडिट लिपिक अन्य विभागामध्ये सामावून घेणे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याचे इकडचे काम झाले की पूढच्या कामामध्ये सामावून घ्या.

**शर्मिला बगाजी :-**

कोणत्या विभागामध्ये रिक्वायरमेन्ट दिलेलीच नसेल तर आपण मागणी मान्य करू शकतो.

**सुदामराव गोडसे :-**

महानगरपालिकेला जरूरत आहे. ३१ मार्च२०१८ पर्यंत शासनानं जी.आर काढलेले आहे. करनिर्धारण करायचे आहे. ३१ मार्च २०१८ पर्यंत त्यांना मुदतवाढ देऊ.

***शर्मिला बगाजी :-***

एल.बी.टी. मध्ये ६ महिन्यापर्यंत.

**प्रकरण क्र. ११ :-**

के अन्वये प्रस्ताव - स्थानिक संस्था कर विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या "ऑडीट लिपीक" यांना अन्य विभागात सामावून घेऊन त्यांच्या करारास मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. ११ :-**

स्थानिक संस्था कर विभागात सध्या ०५ ऑडीट लिपीक कर्मचारी ठोक मासिक मानधन रक्कम (किमान वेतन रु. १५,३९३/-) यावर कार्यरत आहेत. त्यापैकी ०५ ऑडीट लिपीक कर्मचारी यांचा कार्यकाल दि. ०९/०२/२०१७ रोजी संपत आहे. सदरच्या कर्मचाऱ्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांची नावे | मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|
| १. | श्री. सचिन सुपूगडे | दि. ०९/०२/२०१७ |
| २. | श्री. सुशांत सुर्वे | दि. ०९/०२/२०१७ |
| ३. | श्री. रविनाथ शिवगन | दि. ०९/०२/२०१७ |
| ४. | श्रीम. हेमाली बावकर | दि. ०९/०२/२०१७ |
| ५. | श्रीम. निशा पटेल | दि. ०९/०२/२०१७ |

सदर कर्मचाऱ्यांची स्थानिक संस्था कर विभागास आवश्यकता आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार नेमणुकीच्या नवीकरणासाठी मा.स्थायी समितीची पूर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

महानगरपलिकेतील तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत ऑडीट लिपीक कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन मिळणेस शिफारस आहे.

तसेच ऑडीट लिपीक यांना अन्य विभागात सामावून घेऊन त्यांना दि.१०/०२/२०१७ रोजीचा ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन, दि.१३/०२/२०१७ ते दि.१२/०८/२०१७ पर्यंत ही सभा मुदत वाढ देत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शहा      अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपण्याची वेळ १.२० वाजता.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १०/०४/२०१७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दिनांक १०/०४/२०१७ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. ०३/०४/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रभाकर म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | मा. सभापती |
| २. | श्री. हरिश्चंद्र आमगावकर | सदस्य |
| ३. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ४. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५. | श्री. राकेश रतिशचंद्र शहा | सदस्य |
| ६. | श्री. यशवंत ठकाजी कांगणे | सदस्य |
| ७. | श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली | सदस्या |
| ८. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ९. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्य |
| १०. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| ११. | श्रीम. झिन्नत रऊफ कुरेशी | सदस्या |

**गैरहजर सदस्य– निरंक**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| २. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| ३. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ४. | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | सदस्या |
| ५. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांना नमस्कार. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १०/०४/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १, दि. १०/०२/२०१७, दि. १३/०२/२०१७ (दि. १०/०२/२०१७ रोजीची तहकुब सभा) व दि. १७/०२/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**राकेश शहा :-**

मा. सचिव साहेब “के” खाली विषय घ्यायचा आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

दि. १०/०२/२०१७, दि. १३/०२/२०१७ (दि. १०/०२/२०१७ रोजीची तहकुब सभा) व दि. १७/०२/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. १०/०२/२०१७, दि. १३/०२/२०१७ (दि. १०/०२/२०१७ रोजीची तहकुब सभा) व दि. १७/०२/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. १०/०२/२०१७, दि. १३/०२/२०१७ (दि. १०/०२/२०१७ रोजीची तहकुब सभा) व दि. १७/०२/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

२ के खाली विषय आला आहे. तुमची मान्यता असेल तर विषयपत्रिकेतील विषय संपल्यावर घेण्यात येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब मागे आपले ठरले होते की, फेरिवाल्यावर तुम्ही काय कारवाई करणार? त्या मिटींगनंतर आजपर्यंत कारवाई केलेली नाही. ह्या पूढची मिटींग आम्ही तुम्हाला चालवू देणार नाही. आम्ही तुम्हाला वारंवार तक्रार केलेली आहे. तलावरोडला दोन सभापती आहेत. तीन नंबरला आणि चार नंबरला त्यांना किती त्रास होतो. आम्हाला माहित नाही. आम्हाला त्रास होतो तुम्ही आम्हाला आश्वासीत पण केले होते की पुढच्या मिटींगपर्यंत सर्व करुन घेतो. त्यानंतर एकही कारवाई झालेली नाही. पूढची मिटींग तुम्ही चालवू शकता.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

सन्मा. सभापती महोदय मागच्या मिटींगच्या वेळेस जसे बोललो होतो. त्यानुसार सर्व प्रभाग अधिकारी ह्यांना आपण सुचना केलेल्या आहेत. त्यांनी ज्या कारवाया केलेल्या त्याचे रिपोर्टींग करायला सांगितले होते. त्यानुसार त्यांचे रिपोर्टिंग आहे की त्यांनी काय कारवाई केलेली आहे. तुम्ही ज्या ठिकाणाहून जाता तिकडे कारवाई झाली की नाही त्याची माहिती त्याच्याकडून घेऊ.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब तुम्ही अधिकाऱ्यांना वाचवता का.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

वाचवत नाही.

**वर्षा भानुशाली :-**

आज जे तुम्ही बोलता त्याप्रमाणे तुम्ही अधिकाऱ्यांना वाचवता. कोणत्याही जागेवर एक पण कारवाई झालेली नाही. दोन मिटींगनंतर किती गॅप होता तुम्हाला एकाही ठिकाणी कारवाई झाल्याचे दिसले नाही. फक्त रिपोर्ट घेऊन काय करणार? कारवाई करायला पाहिजे ना.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

त्यांच्याकडे दैनंदिन कारवाईचे फोटोग्राफ आहेत आपण बघा.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो आपल्याकडे ६ प्रभाग आहेत त्याच्यात ६ वॉर्ड ऑफिसर आहेत. आणि प्रत्येक वेळेला आपण त्यांना सांगायचे कारवाई करा. त्यांनी ऑफिसमध्ये बसूनच खुर्च्या गरम करायच्या का? त्यांचे कारवाईवर नियंत्रण नाही का? दिवसातून किती फेऱ्या मारायच्या एकदा कारवाई करुन गेल्यावर फेरिवाले पुन्हा तिथे बसणारच तुम्ही ठोक कारवाई काय करता? तिथे एकदा कारवाई झाल्यावर तिकडे तो फेरिवाला बसला नाही पाहिजे. आपण कारवाई कशासाठी करतो.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

प्रशासनाचे म्हणणे ऐकून घ्या. ३१ मार्चला रिकव्हरीचा पिरेड होता. घरपट्टी, पाणीपट्टी..........

**वर्षा भानुशाली :-**

साहेब आम्हाला शब्द कशाला दिला. त्यावेळेला तुम्हाला माहित नव्हते का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

त्यामुळे त्यांनी कारवाई केली नाही असे नाही. कारवाई केलेली आहे. वसूलीवरती फोकस केलेला आहे. आपण १०० टक्के वसूली करावी. असा शासनाचा जी.आर. होता. त्याप्रमाणे सर्वांना कामाचे टार्गेट दिले होते.

**वर्षा भानुशाली :-**

त्यांनी काय कारवाई केली ते दाखवा. ३१ मार्चनंतर आज १० तारीख आहे. त्यामध्ये तुम्ही काय कारवाई केली. तुमचे फोटोग्राफ दाखवा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

जाधव, यादव, भोपतराव.

**नरेंद्र चव्हाण :-**

तुमच्याकडचे सर्व फोटोग्राफ दाखवा. ते रात्री उशीरापर्यंत म्हणजे ११.०० पर्यंत कारवाईचे फोटो आमच्याकडे येतात.

**यशवंत कांगणे :-**

जेसल पार्क सबवेचे काम चाललेले आहे. त्यामुळे सब्जीवाल्यांना जागा दिलेली आहे. तिकडे रेल्वे समांतर रस्ता आहे तिकडे सब्जीवाल्यांना जागा दिलेली आहे. एकही सब्जीवाला तिथे बसत नाही. जेसल पार्क सबवे चालू असताना सर्व त्या रोडवर बसतात. महिलांना पुरुषांना तिथे जायला त्रास होतो. त्याच्यावर कोणती कारवाई केली. कोणाला उठवले नाही आणि ते बोलतात कारवाई केली.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

सबवेच्या इकडे काय कारवाई केली.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब डेटव्हाईज फोटो दाखवा.

**अविनाश जाधव :-**

आपल्याकडे सर्व फोटोग्राफ आहेत.

**यशवंत कांगणे :-**

साहेब तुम्ही माझ्याबरोबर चला कोणी काय कारवाई केली ते तुम्हाला दिसेल. इथे दिशाभूल करुन काय अर्थ आहे का?

**वर्षा भानुशाली :-**

आम्हाला डेटव्हाईज फोटो दाखवा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

तुम्ही लेखी अहवाल त्यांना द्या त्यांना काय व्हेरीफाय करायचे असेल त्यांना फोटोग्राफ दाखवा.

**वर्षा भानुशाली :-**

३ आणि ४ नंबरची कारवाई दाखवा. कुठल्या डेटवर कारवाई केली आहे ते दाखवा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

प्रभाग समिती क्र. ५ चा रिपोर्ट माझ्याकडे आहे. प्रभाग समिती क्र. २ चा रिपोर्ट आहे.

**यशवंत कांगणे :-**

साहेब, तुम्ही बोलताना कारवाई केली दाखवा मी त्या ठिकाणी राहतो. कोणती कारवाई केली ते सांगा. तुम्ही सरळ सरळ खोट बोलता.

**अविनाश जाधव :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, जेसल पार्क ते जैन मंदिरचा जो परिसर आहे तेथे सबवेचे काम चालू आहे. त्या परिसरामध्ये जवळ जवळ १५ वर्षापासून जे बसणारे फेरिवाले आहेत त्यांना नविन जागी शिफ्ट केले. जेसलपार्क चौपाटीकडे जाणारा जो रस्ता आहे त्या रस्त्याला जागा दिली आहे. त्याठिकाणी बसून ते धदां करीत आहेत.

**यशवंत कांगणे :-**

साहेब जाधव साहेब बोलतात की फेरिवाल्यांना आपण रस्ता दिला आहे. कुठे दिला आहे जर तो फेरिवाला तिथे बसला असेल तर मी पद सोडून देईन. खोट बोलायची काय पध्दती असते की नाही.

**अविनाश जाधव :-**

साहेबांच्या समोरच ते सगळ झाले आहे. फेरिवाला पथक तिथे रोजच्या रोज कारवाई करते. त्याचे फोटोग्राफ एच.ओ.डी. ग्रुपवर रोजच्या रोज पाठवले आहे. कारवाईचा अहवाल देता येईल.

(सभागृहात गोंधळ)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

स्पोर्टस क्लबचे सर्व गाड्या उचलल्या होत्या. तशाच गाड्या लागल्या आहेत गोल्डन नेस्टला काम चालू आहे. रोडवर एवढी दुर्गंधी आहे. गेटच्या समोर एवढ्या गाड्या लावल्या आहेत. गोडदेव तलावाच्या बाजूला एवढ्या गाड्या वाढल्या आहेत की तिकडे मराठी शाळेच्या बाजुला गाडी फिरवायला भेटत नाही कुठेच कारवाई होत नाही.

**यशवंत कांगणे :-**

तुम्ही दिशाभूल करता.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

कारवाई केलेली आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

पेपरवर कारवाई करुन होईल का? आणि नविन गाड्या लागत चालल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

बोर्ड, बॅनर व्यतिरिक्त फेरीवाल्याना काढण्यासाठी मंजूरी हा अर्ज कधी आला आहे मला दाखवा.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

बोर्ड, बॅनर व्यतिरिक्त फेरीवाल्याना हटवले फेरीवाल्याचा माल जप्त केला, फोटोग्राफी केली. तुम्ही तुमच्या ऑफिसला फोन करा तुमच्याकडे सी.डी. वगैरे नसतील तर ऑफिसमधून मागवून घ्या.

**यशवंत कांगणे :-**

मी तुम्हाला पुर्ण रेकॉर्डिंग दाखवतो. कुठे बसतात

**तारा घरत :-**

गोडदेव तलावाच्या इथे काही करु नका.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

चिंतामण पाटलाच्या साईडला किती गाड्या लागल्या आहेत गाड्या जाणार कूठून गाडी जायला जागा नसते. गाडी फिरवायला जागा नसते. टॅन्करने पाणी भरायचा त्या ठीक आहेत पण त्याच्या व्यतिरिक्त ज्या लागल्या आहेत त्या गाड्यांवर कारवाई झाली पाहिजे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

संबधीत प्रभाग अधिकारी आपल्याला समजले ना सन्माननीय सदस्य ज्याबद्दल बोलतात......

**वर्षा भानुशाली :-**

मा. आयुक्त साहेब कारवाई कशी करायची असते. तुमच्या कारवाईची पध्दत काय आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आपल्याकडे जे ना फेरीवाला क्षेत्र आहे. मध्यंतरी कोर्टाने ज्या स्थगिती दिल्या होत्या जैसे थे परिस्थिती ठेवायला सांगितली होती. महापालिकेचे असे म्हणणे होते जैसे थे म्हणजे ना फेरीवाला क्षेत्र ठरवले आहे. त्यामध्ये आम्ही करु देणार नाही. ना फेरीवाला क्षेत्रावर प्राधान्याने कारवाई करतो. ना फेरीवाला क्षेत्र कोणते ते मागच्या वेळेस सांगितले होते. ते महासभेने ठरवून दिलेले क्षेत्र आहेत. त्याची आपण माहिती घ्या त्याच्यावर प्राधान्याने कारवाई करतो. कारण त्यांना कुठेच बसू दिले नाही तर कोर्टाचा अवमान होऊन पुन्हा इकडे तिकडे जातील. त्यामुळे ना फेरीवाला क्षेत्रावर कारवाई करतो.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब, केबिन रोडला एक साईडला फेरीवाला क्षेत्र आहे. एक साईडला क्लीन ठेवायचे आहे. तुम्ही प्रभाग अधिकारीला विचारा तिकडे कधी कारवाई केली आहे आणि त्याची कारवाई करायची पध्दत काय आहे. दोन तासानंतर लोक परत येऊन बसतात. जर कारवाई करायची तर नीटनेटके करा. तुमची कारवाई अर्ध्या तासाची असते.

**राकेश शाह :-**

साहेब आप बार बार बोलते हो की, कोर्ट का आदेश है। कितने लोगो का कोर्ट का आदेश आया है वो बताओ।

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

फेरीवाल्यांच्या संघटना गेल्या आहेत.

**राकेश शाह :-**

संघटना पर वो आदेश नही मिला। इन्डीव्ह्युजुअल आदेश मिला है। उसका तपास करो।

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

फेरवाल्यांच्या संघटना इन्डीव्ह्युजुअल नाहीत.

**राकेश शाह :-**

संघटना नही उनको जो आदेश दिया है, जैसे का वैसे रखने के लिए।

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

संघटना का है।

**राकेश शाह :-**

ऑर्डर दिखाओ।

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब, वॉर्ड क्र. १३ चे स्पोर्टस क्लब, गोल्डन नेस्ट सर्कल आणि गोडदेवला ज्या एक्स्ट्रा गाड्या लागल्या आहेत.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

दरवेळेस सदस्यांच्या भावना तीव्र राहतात. वारंवार सभागृहात निवेदन करतो की, पुढच्या वेळेस कारवाई करु तर त्याच्यावर काय कारवाई केली ते आता सांगा. स्पोर्टस क्लबचे सदस्य विचारतात.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

स्टॅन्डिंगचे माझे चौथे वर्ष चार वर्ष मी त्याच्यासाठी भांडतोय. स्पोर्टस क्लब बांधले आहे त्याच्या बाजूला एवढी दुर्गंधी करुन ठेवली आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

तिकडे तुमची दहशत असली पाहिजे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

त्याच्यासमोर अजून एक टपरी बांधली आहे. त्यापण उडवायच्या आहेत.

**सुनिल यादव :-**

गुन्हा दाखल करतो.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब गुन्हा दाखल करुन कारवाई झाली पाहिजे. ती लोक तिकडे दादागिरीने बसले आहेत.

**सुनिल यादव :-**

कारवाई केली तरी बसतात.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

कारवाई करुन बसतात म्हणजे पालिकेचा धाक नाही.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब मज्जीद गल्लीमध्ये काम चालू आहे. त्या गाळावाल्यांना तुम्ही नोटिस पण दिली आहेत. मी सांगितले नोटिस दिली आहे तर कारवाई करा. तर बोलतात मी बघतो. मी बघतो म्हणजे काय? नोटिस दिली आहे तरी का करत नाही.

**सुनिल यादव :-**

ते रस्ता रुंदीकरणाचे आहे.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब मी तुम्हाला पर्सनली सांगितले होते. नोटिस देऊन दोन महिने झाले ते कधी करणार.

**सुनिल यादव :-**

आठवड्यात होईल.

**वर्षा भानुशाली :-**

तिकडे कोर्टाचे काय आहे का? आम्हाला दाखवा कोर्टाचे काय आहे. मा. आयुक्त साहेब ही मिटींग आम्ही पुढे चालू देणार नाही. कारण इकडे गंमतच्या नावावर तुम्ही इकडे मस्ती करता, कोणाची ही कोर्टाची ऑर्डर नाही मला सगळे माहित आहे. अजून ८ दिवस लागणार असे बोलतात. तिकडे रस्त्याचे काम चालू आहे. आम्ही आमचे प्रायव्हेट प्रॉपर्टीचे काम तुम्हाला करायला देतो का? आपण तिथे नोटिस सुध्दा दिलेली आहे.

**सुनिल यादव :-**

गाळे आहेत त्यांना स्टे आहे.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब कोणाला स्टे नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

यादव तुम्ही स्वतः स्टेची ऑर्डर बघितली का?

**सुनिल यादव :-**

हो बघितलेली आहे.

**वर्षा भानुशाली :-**

जर नसेल तर त्याला सस्पेंड करा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

मॅडम म्हणतात तिकडे स्टे नाही आहे. मला आणून दाखवा स्थगिती आहे की नाही.

**वर्षा भानुशाली :-**

स्टे नसेल तर त्याला सस्पेन्ड करा. आम्ही इकडे टाईमपास करायला येतो का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

जर त्यांनी अभ्यास केला नसेल.

**वर्षा भानुशाली :-**

अभ्यास केला नसेल तर घरी पाठवा इथे कशाला येता.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

फाईल मागवून घेऊ.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब मी त्याला चार दिवस झाले फॉलोअप करते. आम्ही इकडे टाईमपास करायला यायचे का? इकडे येऊन खाली बसायचे नाटक करायची आणि घरी जायचे का? तुम्ही त्यावेळी पण बोलले होत की मी पूर्णपणे करुन देतो. आता बोलता टॅक्स म्हणजे टॅक्सचे १० दिवस संपले.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

मार्च क्लोज केलेला नाही. आपण अजून वसुली घेतो.

**वर्षा भानुशाली :-**

तुमच्या अधिकाऱ्याकडे फोटोग्राफ नाही. कुठल्या डेटावर कारवाई केली ते नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

ह्यासाठी सर्वांना उपस्थित राहायला सांगितले. मी पर्सनली सर्व पी.ए. ना फोन करुन सगळ्यांचे रिपोर्ट मागवले आहेत. आपल्याला बघायचे असतील तर सर्वांचे रिपोर्ट बघू शकता.

**यशवंत कांगणे :-**

साहेब तुम्ही रिपोर्ट दाखवू नका. तुम्ही जागेवर जाऊन कारवाई झाली का ते बघा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

तुम्ही जे स्पॉट सांगितले त्यांना मी पर्सनली व्हीजीट करतो.

**वर्षा भानुशाली :-**

तुम्ही प्रत्येक वेळी अधिकाऱ्यांना वाचवायचा प्रयत्न करता.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

प्रभाग अधिकारी वर्क लोडेड आहे.

**वर्षा भानुशाली :-**

किती लोड आहे दाखवा. मी पण सभापती होते किती लोड आहे मला माहित आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

१०० कोटीची घरपट्टी वसूली आतापर्यंत झाली नव्हती. आपण १३० कोटीपर्यंत अशामुळे गेलो की आपण त्याच्यावर अनेक ठिकाणी कारवाया केल्या. ह्या लोकांना ऑलरेडी काम आहेत. आपण मार्च क्लोज केलेले नाही. तुम्ही डेट टाकून फोटो काढा.

**यशवंत कांगणे :-**

साहेब ही लोक इमानदारीने घरपट्टी भरतात, पाणीपट्टी भरतात. ती लोक परेशान आहेत ज्याचे काही देणेघेण नाही ते लोक आरामशीर हातगाड्या लावून रोड ब्लॉक करुन टाकलेले आहेत.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

त्यांच्यावर पण कारवाई करायची आहे.

**यशवंत कांगणे :-**

साहेब तुम्ही माझ्याबरोबर चला मी तुम्हाला दाखवतो. तुम्ही संध्याकाळी ४.०० वाजता या.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

जैसलपार्क, बी.पी. रोड, १३ नंबर वॉर्ड, केबीन रोड.

**मर्लिन डिसा :-**

सर तुम्ही भाईंदर ईस्टसाठी सांगतो. आमच्या मिरारोडला पण लक्ष द्या. स्टेशन रोड, सेक्टर २, शांतीनगर, शितल नगरमध्ये मच्छी मार्केट, संध्याकाळच्या वेळेला फुलवाले रस्त्यावर येतात. लोकांनी चालायचे कुठे. मच्छी मार्केटचे मी प्रत्येक मिटींगला बोलते तो मिरारोडच्या एन्ट्रन्स रोड आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

ह्या सभेपासून पुढची स्टॅन्डिंग कमिटीची सभा होईपर्यंत दैनंदिन फोटो असलेला अल्बम प्रभाग अधिकारी तुमच्याकडे घेऊन यायला सांगतो.

**वर्षा भानुशाली :-**

फक्त फोटो की कारवाई.........

**यशवंत कांगणे :-**

आम्हाला फोटो नको. आम्हाला कारवाई पाहिजे.

**मर्लिन डिसा :-**

साहेब तिथून फेरीवाले निघायला पाहिजेत. फोटो पाठवून काय फायदा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आम्ही रात्री-रात्री उशीरापर्यंत कारवाई करतो.

**मर्लिन डिसा :-**

तुम्ही कारवाई करता आणि अर्ध्या तासाने ती लोक परत येतात.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

रात्री १०-११ वाजता मला भोपतरावांचे फोटो येतात.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आम्ही कारवाई करायला सांगतो. तुम्ही कारवाई करता तुमची फॉरमॅलिटी वापरता. नंतर पुन्हा जे आहे तेच आहे.

(सभागृहात गोंधळ)

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

प्रभाग अधिकारी सन्मा. सदस्यांना आज सभागृहात ह्या ठिकाणी खाली बसले ही प्रशासनाच्या दृष्टीने नामूष्कीची गोष्ट आहे. आपण आपला दरारा असा ठेवला पाहिजे की, त्या फेरिवाल्याची तिथे उभ राहण्याची हिंमत झाली नाही पाहिजे. आजपासून पुढची स्टॅन्डिंग होईपर्यंत तुमचे असे कर्तुत्व दाखवा म्हणजे सदस्यावर ही वेळ येणार नाही.

**तारा घरत :-**

साहेब १२२ आरक्षणावर कारवाई झाली का? उपोषणाला बसलेल्यांना तुम्ही उठवले ना. रस्ता खोदला आहे त्याचे पॅचींग दोन दिवसात करुन देतो ते केल का?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

१२२ पाहिजे ह्या त्याचा आम्ही बऱ्याच वर्षापासून पाठपूरावा करतो. ताईचे लेटर आहेत त्या उपोषणाला बसलेल्या त्याच्यावर काहीच कारवाई होत नाही.

**मर्लिन डिसा :-**

माझ्या उपोषणाचे आश्वासन दिले होते.

**तारा घरत :-**

रस्त्याची पॅचींग झाली का? मला रस्त्याची पॅचींग करुन देणार होते. एक साईडला रस्ता बंद आहे. एक साईडला चालू आहे मध्ये रस्त्याचे तुम्ही बोलले की मी दोन दिवसात करुन देतो. स्मशानाचे पण तुम्ही सांगितले काम चालू होईल. एक चिमणी चालू झाली आहे. लाकडे नाहीत तुम्हाला व्हिजीट द्यायला सांगितले होते.

**मर्लिन डिसा :-**

साहेब मी गेल्यावेळेला मलबार किचनचे सांगितले होते. चार गॅस सिलेंडर ठेवून गाडीमध्ये संध्याकाळच्या वेळेला जेवण बनवून देतो. ते लोकांसाठी हानीकारक आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

सर्व प्रभाग अधिकारी फेरिवाल्यांवरती नियमीत आणि दैनंदिन स्वरुपाची जी कारवाई करतात ती कडक करा. आणि तुमची दहशत बसवा. एक बाजू क्लिअर ठेवायची तर आपण दोन्ही बाजूंनी अलाऊड करतो असे करु नका. आपण ना फेरिवाला क्षेत्र ठरवलेले आहेत. तिथे बोर्ड असतील नसतील. तुम्ही ठराव बघा. ह्यापूर्वी आपण कोणते कोणते ना फेरिवाला क्षेत्र ठरवले आहेत. त्याच्यावर तुम्ही फोकस केले तिकडे गाडी फिरती ठेवली. बाऊन्सर तुमच्या मदतीला दिले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब प्रभाग समिती क्र. ३ आणि ०४ ला क्षेत्र लागून सुलभ शौचालय आहे. तिकडे आपला ना फेरिवालाचा मोठा बोर्ड आहे. संध्याकाळी तिकडे कपडेवाले, भांडीवाले, पूर्ण लायनीत बसलेले असतात तिकडे दोन प्रभाग अधिकारी आहेत त्यांना माहित पडत नाही का? तलाव रोडला संध्याकाळी तुम्ही चालू शकत नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

बी.पी. रोड वरुन स्टेशनला जाऊ शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते ना फेरिवाला क्षेत्र आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

सदस्यांनी सांगितलेला स्पॉट बघून घ्या. ३ नंबर प्रभाग अधिकारी तुम्ही त्याच्यावर जॉइन्टली कारवाई करा. सगळा माल उचलून आणा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब तुम्हाला अजून एक सांगतो ज्या दिवशी कारवाई करणार त्या दिवशी अधिकारी, कर्मचारी जेवढा स्टाफ असेल त्यांचे मोबाईल घेऊन ठेवा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

त्याचा एक रिपोर्ट पूजारी साहेबांकडे द्या की, तुम्ही कुठे कारवाई करणार आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब तसे नाही तुम्ही ठरवा आज आपल्याला तलाव रोडला कारवाई करायची आहे. त्यावेळेला सर्वांचे मोबाईल तुम्ही घेऊन ठेवायचे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

ठिक आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रोग्राम तुम्ही ठरवायचा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यांनी एकत्र यायचे, कुठे यायचे ते ठरवायचे नाही. इथून डायरेक्ट जायचे.

**मर्लिन डिसा :-**

साहेब, शांतीनगरला नगरसेवकाचे ऑफीस आहे. त्याच्याबाहेर ना फेरीवाला क्षेत्र म्हणून फलक आहे. तिथे एकदम स्विंगमध्ये चालू असते.

**वर्षा भानुशाली :-**

फलक के उपर कपडा डालते है।

**मर्लिन डिसा :-**

ना फेरीवाला झोन पुरा दिन चालू रहता है।

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आरक्षण क्र. १२२ चे काय बोलले.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

आपण बघू या. तुम्ही फाईल मागवून घ्या.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आरक्षण क्र. १२२ चे जवळजवळ वर्ष झाले. आज कारवाई करु, उद्या पोलीस स्टेशनमधून परमिशन येईल, आम्हाला बंदोबस्त भेटेल, बाऊंसर आहेत. मग कारवाई होत नाही त्याचे कारण काय?
परिस्थिती एवढी बेकार आहे. आतमध्ये केमिकलचे ड्रम, कचरपट्टी......

**सुनिल यादव :-**

प्रोग्राम लावला आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

प्रोग्राम लावला याचा अर्थ असा नाही ज्यांनी तिथे जमा केले ते आम्हाला पूर्ण साफ पाहिजे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

गुन्हा दाखल करा.

**सुनिल यादव :-**

दिला आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

दिला नाही. गुन्हा दाखल करा मग काढायला जा.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

रणबहाद्दुर म्हणून एक आहेत त्यांनी पण पालिकेच्या जागेत अतिक्रमण केलेले आहे. ते पण साफ झाल पाहिजे. १२२ आरक्षणामध्ये केमिकलचे ड्रम, कचरा भरपूर भरलेला आहे. तिकडे आग लागली तर मोठी जिवित हानी होऊ शकते.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

घरत मॅडम मागच्या वेळेला उपोषणाला बसल्या होत्या. सुनिल यादव प्रभाग अधिकारी ह्यांना आदेश काढायचा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण कलेक्शन सुरुवात केले आहेत. माझ्या इमारतीमध्ये १०० फ्लॅट आहेत. माझ्या १०० फ्लॅटमधल्या ९० लोकांनी टॅक्स भरलेला आहे. १० लोकांमध्ये कोणाचे लॉक आहे, कोण बाहेर गेले आहेत. तुम्ही सरसकट येऊन नळ कनेक्शन कापून जातात. मग ९० लोकांनी जे पैसे भरले ते गुन्हेगार आहेत का? १० लोकांनी टॅक्स भरला नाही म्हणून तुम्ही ९० जणांचे नळ कनेक्शन कसे कापून येता.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

आपण त्याच्यात रिव्हाईज सुचना दिल्या. १० लोकांसाठी ९० लोकांना त्रास द्यायचा नाही. त्यांना आपण जॉईट करुन देऊ. १० लोकांवर वेगळी कारवाई करु.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, शिवशक्ती कॉम्प्लेक्स साईबाबाची बिल्डींग आहे. त्याचे किती कलेक्शन बाकी असेल. कोणाचे २ रु., कोणाचे ३ रु. कोणाचे ५ रु. त्यांना पण तुम्ही नळ कनेक्शन कापण्याची धमकी देता. २-४ हजार नाही. फक्त २-३ रु.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.) :-**

आपल्याला इन्डीव्हुजुअल रिकव्हरी केली असती तर एवढी टॅक्स वसुली झाली नसती. ह्या पुढे सुचना दिल्या आहेत ९० लोकांनी जर भरले असेल तर करुन घ्या. १० लोकांवर वेगळी कारवाई करु.

**वर्षा भानुशाली :-**

पाणी डिपार्टमेंटचे मला विचारायचे होते. कारण वॉर्डामध्ये पाण्याचा भरपुर प्रॉब्लेम आहे.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, शहरामध्ये साधारण ४० ते ४८ तासाने पाणीपूरवठा करतो.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब तुम्ही चूकीचे बोलता.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

मागच्या आठवड्यात पाणी पूरवठा खंडित झाला होता. शहाडला जे पाणी दूषीत झाले होते त्याच्यामुळे पाणी बंद केले होते. त्याच्या मूळे ती सिस्टीम लेट झाली आहे. ७० तासावर आलेली आहे. ह्याच्यापूढे पाणी पूरवठा सुरळीत होणार आहे. काल १३६ एम.एल.डी. पाणी आलेले आहे.

**वर्षा भानुशाली :-**

प्रेशर खूप कमी आहे.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

बिल्डींगला पाणी पोहोचत नाही पूर्ण १३६ एम.एल.डी. पाणी आले.

**वर्षा भानुशाली :-**

आता रेग्यूलर होईल का?

**श्रीकृष्ण मोहिते :-**

हो आता रेग्यूलर होईल.

**वर्षा भानुशाली :-**

ह्याच्यावर विशेष ध्यान द्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २, महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांची सेवा खंडीत करुन नव्याने नेमणूक देणेबाबत.

**वर्षा भानुशाली :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मा. स्थायी समिती ठराव क्र. १० अन्वये ०४ लघुटंकलेखक यांची किमान वेतन दरानुसार सहा महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यापैकी ०१ लघुलेखकाने राजीनामा दिलेला आहे. उर्वरित ०३ लघुलेखक कार्यरत आहेत.

मा.महासभा ठराव क्र.१३८ अन्वये व दि.०३/०३/२०१६ रोजीच्या मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा.आयुक्त यांना सर्व विभागाचे किमान वेतनाबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी प्राधिकृत केल्यानुसार किमान वेतन दरानुसार लघुटंकलेखक यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | लघुलेखकाची नावे | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| १ | श्री. रविंद्र चव्हाण नागनाथ | लघुटंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग |
| २ | श्री.बहिरम अनिल तुकाराम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |
| ३ | श्री.सपकाळे गुणवंत दयाराम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |

मा. स्थायी समिती सभा दि. १०/०२/२०१७ प्रकरण क्र. १०८ ठराव क्र. १०३ अन्वये सदर लघुटंकलेखकांच्या नियुक्तीस दि. १७/०३/२०१७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्याअन्वये सदर लघुटंकलेखकांची मुदत दि. १७/०३/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे.

महानगरपालिका मा.महासभा, मा.स्थायी समिती सभा, मा.आयुक्त, व उपायुक्त (मुख्यालय), प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृत्तांत लिहीण्यासाठी लघुटंकलेखकांची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) नुसार तात्पुरत्या नेमणुकीसाठी मा. स्थायी समितीची पुर्व मंजूरी घेणे अनिवार्य आहे.

महानगरपालिकेच्या कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर लघुटंकलेखक दि. २०/०३/२०१७ ते दि. १९/०९/२०१७ पर्यंत ०६ महिन्यांकरीता नेमणूकीचे नवीकरण करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**यशवंत कांगणे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

*ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.*

**प्रकरण क्र. ०२ :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांची सेवा खंडीत करुन नव्याने नेमणूक देणेबाबत.

**ठराव क्र. ०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मा. स्थायी समिती ठराव क्र. १० अन्वये ०४ लघुटंकलेखक यांची किमान वेतन दरानुसार सहा महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यापैकी ०१ लघुलेखकाने राजीनामा दिलेला आहे. उर्वरित ०३ लघुलेखक कार्यरत आहेत.

मा.महासभा ठराव क्र.१३८ अन्वये व दि.०३/०३/२०१६ रोजीच्या मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा.आयुक्त यांना सर्व विभागाचे किमान वेतनाबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी प्राधिकृत केल्यानुसार किमान वेतन दरानुसार लघुटंकलेखक यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | लघुलेखकाची नावे | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| १ | श्री. रविंद्र चव्हाण नागनाथ | लघुटंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग |
| २ | श्री.बहिरम अनिल तुकाराम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |
| ३ | श्री.सपकाळे गुणवंत दयाराम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |

मा. स्थायी समिती सभा दि. १०/०२/२०१७ प्रकरण क्र. १०८ ठराव क्र. १०३ अन्वये सदर लघुटंकलेखकांच्या नियुक्तीस दि. १७/०३/२०१७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्याअन्वये सदर लघुटंकलेखकांची मुदत दि. १७/०३/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे.

महानगरपालिका मा.महासभा, मा.स्थायी समिती सभा, मा.आयुक्त, व उपायुक्त (मुख्यालय), प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृत्तांत लिहीण्यासाठी लघुटंकलेखकांची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) नुसार तात्पुरत्या नेमणुकीसाठी मा. स्थायी समितीची पुर्व मंजूरी घेणे अनिवार्य आहे.

महानगरपालिकेच्या कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर लघुटंकलेखक दि. २०/०३/२०१७ ते दि. १९/०९/२०१७ पर्यंत ०६ महिन्यांकरीता नेमणूकीचे नवीकरण करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली अनुमोदन :- श्री. यशवंत कांगणे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०३, मिरा भाईदर महानगरपालिका अग्निशमन विभागातील सब स्टेशन ऑफीसर श्री. धनंजय वसंतराव कनोजे यांच्या अपिल अर्जावर विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**यशवंत कांगणे :-**

मिरा भाईदर महानगरपालिका अग्निशमन विभागात सब स्टेशन ऑफीसर या पदावर श्री. धनंजय वसंतराव कनोजे कार्यरत असून त्यांच्यावर दि. ०९/०६/२०१६ रोजी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याबाबत लावलेली शास्ती निष्काषीत करण्यासाठी मा. स्थायी समिती पुढे अपिल दाखल केले आहे. दि. २२/०५/२०१६ रोजी उत्तन धावगी रोड येथे घनकचरा प्रकल्पाला लागलेली आग विझविण्यामध्ये हलगर्जीपणा केल्याबद्दल दोषी धरुन मा. आयुक्त यांनी दि. ०९/०६/२०१६ च्या आदेशान्वये श्री. धनंजय कनोजे यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याबाबत आदेश पारित केलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागात सब स्टेशन ऑफीसर या पदावर श्री. धनंजय वसंतराव कनोजे कायमस्वरुपी कर्मचारी असून दि. १२/०७/२०१० पासून अग्निशमन विभागात कार्यरत आहेत. त्यांचा आजपर्यंतचा सेवाकाळ हा समाधानकारक असून मिरा भाईंदर महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेले काम तसेच प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी पदाचा कार्यभार यशस्वीरित्या व समाधानकारक पार पाडलेला आहे. श्री. धनंजय वसंतराव कनोजे यांचे अपिलाचे अवलोकन करता त्यांचेवर महानगरपालिकेने केलेली कार्यवाही नियमानुसार व त्यांनी सादर केलेल्या खुलाशाचा विचार करून करणेत आलेली नसल्याचे निदर्शनास येत आहे. यास्तव श्री. धनंजय वसंतराव कनोजे यांचे अपिल मान्य करणेत येवून दि. ०९/०६/२०१६ अन्वये एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याबाबत लावलेली शास्ती रद्द करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागातील सब स्टेशन ऑफीसर श्री. धनंजय वसंतराव कनोजे यांच्या अपिल अर्जावर विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका अग्निशमन विभागात सब स्टेशन ऑफीसर या पदावर श्री. धनंजय वसंतराव कनोजे कार्यरत असून त्यांच्यावर दि. ०९/०६/२०१६ रोजी मा. आयुक्त, मिरा भाईदर महानगरपालिका

यांनी एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याबाबत लावलेली शास्ती निष्काषीत करण्यासाठी मा. स्थायी समिती पुढे अपिल दाखल केले आहे.

दि. २२/०५/२०१६ रोजी उत्तन धावगी रोड येथे घनकचरा प्रकल्पाला लागलेली आग विझविण्यामध्ये हलगर्जीपणा केल्याबद्दल दोषी धरुन मा. आयुक्त यांनी दि. ०९/०६/२०१६ च्या आदेशान्वये श्री. धनंजय कनोजे यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याबाबत आदेश पारित केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागात सब स्टेशन ऑफीसर या पदावर श्री. धनंजय वसंतराव कनोजे कायमस्वरुपी कर्मचारी असून दि. १२/०७/२०१० पासून अग्निशमन विभागात कार्यरत आहेत. त्यांचा आजपर्यंतचा सेवाकाळ हा समाधानकारक असून मिरा भाईंदर महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेले काम तसेच प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी पदाचा कार्यभार यशस्वीरित्या व समाधानकारक पार पाडलेला आहे.

श्री. धनंजय वसंतराव कनोजे यांचे अपिलाचे अवलोकन करता त्यांचेवर महानगरपालिकेने केलेली कार्यवाही नियमानुसार व त्यांनी सादर केलेल्या खुलाशाचा विचार करून करणेत आलेली नसल्याचे निदर्शनास येत आहे.

यास्तव श्री. धनंजय वसंतराव कनोजे यांचे अपिल मान्य करणेत येवून दि. ०९/०६/२०१६ अन्वये एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याबाबत लावलेली शास्ती रद्द करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. यशवंत कांगणे अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगांवकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०४, वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेख विवरण पत्र (सन २०१५-१६) तयार करणेबाबत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

प्रतिवर्षी मागील वर्षातील प्रशासन अहवाल, परिवहन उपक्रमाच्या प्रशासन व्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशिलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रक्कम व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणाऱ्या विवरणपत्र तपासणीबाबत त्याचा आढावा घेण्यात आला आहे.

उक्त प्रशासन अहवालाच्या (सन २०१५-१६) प्रती छापून प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या ठिकाणी किंवा माहित असलेल्या शेवटच्या स्थानिक निवासस्थानी छपाईनंतर ७ दिवसांच्या आत पाठविण्यात याव्यात. याबाबत एकूण २०० प्रती छपाई करण्यास व आवश्यकता भासल्यास विभागप्रमुखांच्या मागणीनुसार आवश्यक त्या प्रती छपाई करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०४ :-**

वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेख विवरण पत्र (सन २०१५-१६) तयार करणेबाबत.

**ठराव क्र. ०४ :-**

प्रतिवर्षी मागील वर्षातील प्रशासन अहवाल, परिवहन उपक्रमाच्या प्रशासन व्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशिलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रक्कम व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणाऱ्या विवरणपत्र तपासणीबाबत त्याचा आढावा घेण्यात आला आहे.

उक्त प्रशासन अहवालाच्या (सन २०१५-१६) प्रती छापून प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या ठिकाणी किंवा माहित असलेल्या शेवटच्या स्थानिक निवासस्थानी छपाईनंतर ७ दिवसांच्या आत पाठविण्यात याव्यात. याबाबत एकूण २०० प्रती छपाई करण्यास व आवश्यकता भासल्यास विभागप्रमुखांच्या मागणीनुसार आवश्यक त्या प्रती छपाई करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०५, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बांधकाम व पाणी पुरवठा विभागामार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विकास व देखभाल दुरुस्ती कामांवर नियंत्रणासाठी Geo Tagged Project Monitoring System साठी रिध्दी मॅनेजमेंट प्रा.लि. यांची नेमणूक करण्यास मान्यता देणेबाबत.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर विषयाची अपूऱ्या माहितीमूळे निविदा फेरसादर करावी. असा मी ठराव मांडत आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय फेरसादर करणे.

**प्रकरण क्र. ०५ :-**

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या बांधकाम व पाणी पुरवठा विभागामार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विकास व देखभाल दुरुस्ती कामांवर नियंत्रणासाठी Geo Tagged Project Monitoring System साठी रिध्दी मॅनेजमेंट प्रा.लि. यांची नेमणूक करण्यास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ०५ :-**

सदरचा प्रस्ताव योग्य माहितीसह पुढील सभेत फेरसादर करावा.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शहा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०६, महापालिका जागेवर प्रदुषण व वातावरण नियंत्रणदर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करण्यासाठी कंत्राटदार नियुक्ती करणे कामांची निविदा मंजूरी बाबत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महापालिका प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) जागेवर ३० X १५ चौ.फुट आकारमानाचे एकुण ८ फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करणेबाबत ऑनलाईन निविदा दै.दबंग दुनिया व दै.जनमत दि.१९/१०/२०१६ रोजीच्या वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करणेत आली आहे. सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर N.I.C. Tender ID Go. 161584_1 ने प्रसिध्द केली असुन दि.२१/१०/२०१६ ते दि.०५/११/२०१६ या कालावधीत ऑनलाईन फॉर्म विक्री व दि.०५/११/२०१६ रोजी दु.३.०० वा. पर्यंत निविदा स्विकारणेची मुदत देण्यांत आली होती. सदर कालावधीत एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

तद्नंतर सदर निविदेस दि.०६/११/२०१६ ते दि.१६/११/२०१६ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यांत आली. सदर कालावधीत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Tender ID 161584_1 वर ६ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

सदर प्राप्त निविदेमधील तांत्रिक लिफाफा (टेक्नीकल बीड) उघडणेबाबत उपआयुक्त (जाहिरात) यांची मान्यता असुन त्याअनुषंगे जा.क्र.मनपा/जाहिरात/२९९/२०१६-१७ दि.२१/११/२०१६ अन्वये सिस्टीम प्रोग्रामर, ई टेंडरींग विभाग यांना पत्र दिले होते. त्यानुसार निविदेमधील ०६ निविदाधारक यांचे तांत्रिक लिफाफा (टेक्नीकल बीड) दि.२५/११/२०१६ रोजी उघडण्यांत आलेल्या असुन सदर निविदेत मे. फ्रंटऐज मिडीया, इमेज मार्केटींग, व प्राईम स्पॉट आऊटडोर्स यांनी निविदेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचे फायनान्शीयल बीड मा. निविदा निवड समितीच्या दि.११/०१/२०१७ रोजीच्या मंजुरीने फायनान्शीयल बीड उघडले असता निविदाधारकांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव व टेंडर आय.डी.क्र. | मुल्याधिकारीक रक्कम | निविदा धारकाने सादर केलेले दर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मे. इमेज मार्केटींग | मे. फ्रंटऐज मिडीया | प्राईम स्पॉट आऊटडोर्स |
| १ | महापालिका जागेवर प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करण्यासाठी कंत्राटदार नियुक्ती करणे 161584_1 | १७,२८,००० (पहिले वर्ष) | १९,००,८०० | १८,५७,६०० | १७,२८,००२ |
| | | १९,००,८०० (दुसरे वर्ष) | २०,९०,८८० | २०,४३,३६० | १९,००,८०२ |
| | | २०,९०,८८० (तिसरे वर्ष) | २२,९९,९६८ | २२,४७,६९६ | २०,९०,८८२ |
| | | ५७,१९,६८० (एकुणरक्कम) | ६२,९१,६४८ | ६१,४८,६५६ | ५७,१९,६८६ |

तरी वरील तक्ता पाहता मे. इमेज मार्केटींग यांनी सादर केलेले दर हे वार्षिक मुल्याधिकारीक रक्कमेपेक्षा व मे. फ्रंटऐज मिडीया व प्राईम स्पॉट आऊटडोर्स यांचेशी तुलना करता अधिक असल्याने प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करणे कामाचा ठेका ३ वर्षे कालावधीकरीता मे. इमेज मार्केटींग यांना देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**यशवंत कांगणे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०६ :-**

महापालिका जागेवर प्रदुषण व वातावरण नियंत्रणदर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करण्यासाठी कंत्राटदार नियुक्ती करणे कामांची निविदा मंजूरी बाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महापालिका प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) जागेवर ३० X १५ चौ.फुट आकारमानाचे एकुण ८ फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करणेबाबत ऑनलाईन निविदा दै.दबंग दुनिया व दै.जनमत दि.१९/१०/२०१६ रोजीच्या वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करणेत आली आहे. सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर N.I.C. Tender ID Gò. 161584_1 ने प्रसिध्द केली असुन दि.२१/१०/२०१६ ते दि.०५/११/२०१६ या कालावधीत ऑनलाईन फॉर्म विक्री व दि.०५/११/२०१६ रोजी दु.३.०० वा. पर्यंत निविदा स्विकारणेची मुदत देण्यांत आली होती. सदर कालावधीत एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

तद्नंतर सदर निविदेस दि.०६/११/२०१६ ते दि.१६/११/२०१६ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यांत आली. सदर कालावधीत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Tender ID 161584_1 वर ६ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

सदर प्राप्त निविदेमधील तांत्रिक लिफाफा (टेक्नीकल बीड) उघडणेबाबत उपआयुक्त (जाहिरात) यांची मान्यता असुन त्याअनुषंगे जा.क्र.मनपा/जाहिरात/२९९/२०१६-१७ दि.२१/११/२०१६ अन्वये सिस्टीम प्रोग्रामर, ई टेंडरींग विभाग यांना पत्र दिले होते. त्यानुसार निविदेमधील ०६ निविदाधारक यांचे तांत्रिक लिफाफा (टेक्नीकल बीड) दि.२५/११/२०१६ रोजी उघडण्यांत आलेल्या असुन सदर निविदेत मे. फ्रंटऐज मिडीया, इमेज मार्केटींग, व प्राईम स्पॉट आउटडोर्स यांनी निविदेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचे फायनान्शीयल बीड मा. निविदा निवड समितीच्या दि.११/०१/२०१७ रोजीच्या मंजुरीने फायनान्शीयल बीड उघडले असता निविदाधारकांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव व टेंडर आय.डी.क्र. | मुल्याधिकारीक रक्कम | निविदा धारकाने सादर केलेले दर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मे. इमेज मार्केटींग | मे. फ्रंटऐज मिडीया | प्राईम स्पॉट आऊटडोर्स |
| १ | महापालिका जागेवर प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करण्यासाठी कंत्राटदार नियुक्ती करणे 161584_1 | १७,२८,००० (पहिले वर्ष) | १९,००,८०० | १८,५७,६०० | १७,२८,००२ |
| | | १९,००,८०० (दुसरे वर्ष) | २०,९०,८८० | २०,४३,३६० | १९,००,८०२ |
| | | २०,९०,८८० (तिसरे वर्ष) | २२,९९,९६८ | २२,४७,६९६ | २०,९०,८८२ |
| | | **५७,१९,६८० (एकुणरक्कम)** | **६२,९१,६४८** | **६१,४८,६५६** | **५७,१९,६८६** |

तरी वरील तक्ता पाहता मे. इमेज मार्केटींग यांनी सादर केलेले दर हे वार्षिक मुल्याधिकारीक रक्कमेपेक्षा व मे. फ्रंटऐज मिडीया व प्राईम स्पॉट आऊटडोर्स यांचेशी तुलना करता अधिक असल्याने प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करणे कामाचा ठेका ३ वर्षे कालावधीकरीता मे. इमेज मार्केटींग यांना देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील    अनुमोदन :- श्री. यशवंत कांगणे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०७, स्थायी समिती सभापती स्वेच्छा निर्णय निधीतून विकास कामे करणेबाबत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1 | भाईंदर (पूर्व) नवघर येथील नवघर जुना तलाव येथील उद्यान विकसित व सुशोभिकरण करणे. | रु.39,99,940/- |
| 2 | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र.12 नवघर मराठी शाळे समोरील मैदानामध्ये नविन गेट बांधणे, विहीरीची दुरूस्ती करणे व सी.सी. पाथवे, उद्यान विकसित करणे. | रु.49,64,200/- |

**वरील पैकी अ.क्र. 1 कामासाठी "स्थायी समिती सभापती स्वेच्छा निर्णय निधी" या लेखाशिर्षाअंतर्गत व अ.क्र. 2 कामासाठी "उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी अंतर्गत तरतुद शिल्लक आहे. तथापी सदर कामावर 31 मार्च 2017 पर्यत खर्च पडणार नसुन सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पातुन होणार आहे. तरी वरील कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.**

**तारा घरत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०७ :-**

स्थायी समिती सभापती स्वेच्छा निर्णय निधीतून विकास कामे करणेबाबत.

**ठराव क्र. ०७ :-**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1 | भाईंदर (पूर्व) नवघर येथील नवघर जुना तलाव येथील उद्यान विकसित व सुशोभिकरण करणे. | रु.39,99,940/- |
| 2 | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र.12 नवघर मराठी शाळे समोरील मैदानामध्ये नविन गेट बांधणे, विहीरीची दुरूस्ती करणे व सी.सी. पाथवे, उद्यान विकसित करणे. | रु.49,64,200/- |

**वरील पैकी अ.क्र. 1 कामासाठी "स्थायी समिती सभापती स्वेच्छा निर्णय निधी" या लेखाशिर्षाअंतर्गत व अ.क्र. 2 कामासाठी "उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी अंतर्गत तरतुद शिल्लक आहे. तथापी सदर कामावर 31 मार्च 2017 पर्यत खर्च पडणार नसुन सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पातुन होणार आहे. तरी वरील कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.**

सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगांवकर अनुमोदन :- श्रीम. तारा घरत

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०८, धुरफवारणी करीता मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब औषधाची फवारणी होत नाही. माझ्या वॉर्डमध्ये चिकणगुणीयाचे पेशन्ट आहेत. मच्छराचे प्रमाण खूप वाढले आहे.

**मर्लिन डिसा :-**

तलाव सुशोभिकरण त्याच्यावर नियंत्रण ठेवायला पाहिजे. तिथे घाण व्हायला नाही पाहिजे. फूल पाण्यात टाकायला नाही पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

निर्माल्य कलश ठेवा.

**मर्लिन डिसा :-**

ते परत कम्पोस्टिंगसाठी पाठवले तर बरे होईल.

**वर्षा भानुशाली :-**

औषधाची फवारणी किती प्रमाणात करतो. आणि मच्छरचे प्रमाण एवढे का वाढले आहे. आता मच्छरचे प्रमाण कमी असायला पाहिजे. ते जास्त झाले आहे. माझ्या पूजा नगर एरियामध्ये महिण्यानंतर फवारणी केली असेल. किती दिवसानंतर ती एरिया कव्हर करता.

**डॉ. जाधव :-**

८-१० दिवसांत कव्हर झाली पाहिजे.

**वर्षा भानुशाली :-**

दोन महिण्यानंतर माझ्या एरियामध्ये मला परवा फोन आला. काल पाठवले म्हणजे दोन महिण्यानंतर होते. तुम्ही ८ दिवसात बोलता.

**राकेश शहा :-**

शहरात किती टेम्पो चालू आहेत.

**एस.आय. आरोग्य :-**

७ टेम्पो आहेत .

**राकेश शहा :-**

३ और ४ नंबर मिलाके एकही टेम्पो है। ६ प्रभाग है। ३ और ४ मिलाके एकही टेम्पो है तो ७ टेम्पो किधर चालू है।

**वर्षा भानुशाली :-**

३ और ४ में २ टेम्पो होने चाहिए। पूजा नगरमध्ये एकाच बिल्डींगमध्ये चिकन गुणियाचे ५ते ७ पेशन्ट आहेत. मला कालच फोन आला होता.. एक महिण्यापासून धूवाफवारणी केलीच नाही. औषध कमी आणि पाणी जास्त टाकत असाल. मच्छरचे प्रमाण वाढायचे कारण काय ते मी तुम्हाला विचारते. नुसते पाणी टाकता का? औषध नाहीत का?

**डॉ. जाधव :-**

मॅडम औषध आहेत. पाणी वैगेरे टाकून आपण फवारणी वैगेरे करत नाही. जे आहे ते सायंटिफिक रितीनेच फवारणी करतो. मच्छर वाढण्याचे कारण म्हणजे गटर बऱ्यापैकी ब्लॉक आहेत. त्याच्यामूळे त्याचे ब्रिडिंग होते. हे मेन कारण असू शकते.

**राकेश शहा :-**

साहेब, मेरा वॉर्ड सबसे छोटा वॉर्ड है। दो बार तीन बार टेम्पो आयेगा तो वार्ड पूरा कर देते है। एक बार सुबह आता है तो टेम्पो दो बार घूम नही सकता है क्या?

**वर्षा भानुशाली :-**

तुम्ही औषधाचे प्रमाण कमी देता त्यामुळे दूसरे राऊन्ड करू शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

असा प्रोग्राम करा की एका दिवसात एक वॉर्ड झालाच पाहिजे. औषध संपले की त्याचे टेम्पो बंद होते. ज्याप्रमाणे वॉर्ड असेल ना त्याप्रमाणे औषध एक्स्ट्रा द्या. तुम्ही देताना औषध कमी देता.

**मर्लिन डिसा :-**

सर अजून एक काळजी घ्यायला पाहिजे. धूर फवारणी करताना छोटी छोटी मूल धूराबरोबर पळत येतात. ते त्यांच्या हेल्थसाठी बरोबर नाही. त्याची काळजी घ्या. फवारणी करणाऱ्यांना मास्क द्या.

**राकेश शहा :-**

प्रकरण क्र. ८ ठराव टाईप करणे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

***प्रकरण क्र. ०८ :-***

धुरफवारणी करीता मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत.

**ठराव क्र. ०८ :-**

प्रशासनाने सदर विषय पुरक माहितीसह पुढच्या सभेत सादर करावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शहा अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०९, निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**प्रेमनाथ पाटील :-**

| अ क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च/ ठेकेदाराने सादर केलेले दर | मा. आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. समिती शिफारस दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसि दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ |
| १. | 188583_1 | भाईंदर (पुर्व) गोडदेव येथील स्व. इंदिरा गांधी उद्यान विकसीत व सुशोभीकरण करणे (स्थायी समिती निधी)<br>मे. एन जे ब्रदर्स | रू.४९,९९,९९०/-<br>९.००००% जास्त दराने दरवाटाघाटीनंतर | दि.१६/१२/२०१६ | दि.०२/०३/२०१७ | दै. आपला वार्ताहर, दै. अब्सुलेट इंडिया, दै. महाराष्ट्र सम्राट | दि.१०/०१/२ |

